दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे



✻ (आष्टी) वर्धा ✻ शनिवार, दि.१२ एप्रिल २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १७६ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

जिल्ह्यात सहकारचा पाया भक्कम करणार : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

वर्धा नागरी सहकारी बँकेच्या पुलगाव शाखेचे नवीन वास्तूमध्ये स्थानांतरण



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा :देशाच्या विकासामध्ये सहकार क्षेत्राचे मोलाचे योगदान आहे. केंद्र शासनाने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष म्हणून घोषित केले आहे. 'सहकार से समृध्दी' हा उपक्रम शासन राबवित आहे. जिल्ह्यात गाव पातळीवर सहकाराचे काम करणाऱ्या सेवा सहकारी सोसायटी संगणकीकृत करण्याचे काम हाती घेण्यात आले असून राज्यातील जवळपास ८ हजार सेवा सोसायट्या संगणकीकृत करण्यात आल्या आहेत. मागील काळात बंद असलेली मध्यवर्ती सहकारी बँक पुन्हा सुरू करण्यात आली असून येणाऱ्या काळात जिल्ह्यात सहकारचा पाया अधिक भक्कम करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे गृह (ग्रामिण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

पुलगाव येथील वर्धा नागरी सहकारी अधिकोष (बँक) मर्यादीत शाखेचे नवीन वास्तुत स्थानांतरणाचा कार्यक्रम पुलगाव येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. आमदार राजेश बकाने, आरएसएसचे जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत, वर्धा नागरी बँकेचे अध्यक्ष डॉ. विनय देशपांडे, उपाध्यक्ष मंगेश परसोडकर, माजी अध्यक्ष केशवराव दांडेकर, अनिलराव जोशी यांच्यासह बँकेचे संचालक, भागधारक व खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्धा नागरी सहकारी बँकेच्या छोट्याश्या रोपट्याचे रुपांतर आता मोठ्या वटवृक्षात झाले आहे. खातेदार, भागधारक, कर्मचारी यांचा यामध्ये मोठा वाटा आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. भोयर पुढे म्हणाले की, शिस्तबध्द काम करणारी वर्धा नागरी बँक आहे. सहकार वर्षात वर्धा नागरी बँकेच्या नव्याने जिल्ह्याबाहेर तीन शाखा सुरू झाल्या आहेत ही आनंदाची बाब असून बँकेचे अध्यक्ष, संचालक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन त्यांनी यावेळी केले.

आमदार राजेश बकाने म्हणाले की, वर्धा नागरी सकारी बँकेच्या जिल्ह्यात १३ शाखा आहेत आणि जिल्ह्याबाहेर सुध्दा शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. खऱ्या अर्थाने शाखा वाढविण्याचे श्रेय कर्मचारी व खातेदारांचे आहे, असे ते म्हणाले.

यावेळी माजी अध्यक्ष श्री. दांडेकर यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे अध्यक्ष डॉ. विनय देशपांडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष मंगेश परसोडकर यांनी मानले.

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांना जयंती निमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांना जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विनम्र अभिवादन केले. सागर शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आदींनीही महात्मा फुले यांना अभिवादन केले.

राज्यात येलो अलर्ट, हवामान खात्याकडून अवकाळी पावसाचा इशारा



वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : गेल्या काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होताना दिसतोय. होळीनंतर उष्णता वाढण्याचे संकेत होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये अवकाळी पाऊस झाला. गारपिटीमुळे पिकांचे नुकसान झाले. राज्यातील काही भागांमध्ये अवकाळी पावसाने झोडपले. अजूनही अवकाळीचे ढग आहेत. राज्यात पावसाला पोषक असे वातावरण आहे. सततच्या अवकाळी पावसामुळे पाऱ्यात घट झाली होती. मात्र, आता काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आलाय तर काही भागांमध्ये परत एकदा अवकाळी पाऊस आणि वाऱ्याचा इशारा हा हवामान खात्याकडून देण्यात आलाय.

होळीच्या अगोदर हवामान खात्याकडून उष्णतेच्या लाटेचा दोनदा इशारा देण्यात आला होता. हेच नाही तर अनेक शहरांमध्ये पारा ४१ अंश सेल्सिअसच्या आसपास गेल्याचेही बघायला मिळाले. जळगाव आणि अकोल्यात ४३.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झालीये. आज हवामान खात्याकडून आठ जिल्हांमध्ये विजांसह पावसाचा येलो अलर्ट हा भारतीय हवामान खात्याकडून देण्यात आलाय.

विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाचा मोठा इशारा

दुसरीकडे तीन जिल्हांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आलाय. हवामान ढगाळ असल्याने उकाडा वाढण्याचीही शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून विदर्भात सूर्य आग ओकताना दिसतोय. आता गडचिरोली, भंडारा, गोदिंया, अमरावती, वर्धा, नागपूर याठिकाणी वारे, विजांचा कडकडाट आणि पाऊस येण्याची शक्यता आहे. तसा इशाराच हवामान खात्याकडून देण्यात आलाय.

राज्यात अवकाळीचे संकट कायम गारपिटीची शक्यता

बीड, जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगर या जिल्हांमध्ये रात्रीच्या वेळी उष्णतेत वाढ होण्याचा अंदाज वर्तवण्यात आलाय. कोकणात देखील हवामान खात्याकडून उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट देण्यात आला होता. अवकाळी पावसामुळे फळ बागांचे देखील मोठे नुकसान झाल्याचे राज्यात बघायला मिळतंय. पाऊस आणि वाढलेली उष्णता सध्या बघायला मिळतंय. मुंबई आणि पुण्यात सामान्य वातावरण बघायला मिळाले. सांगली, लातूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगरमध्ये अवकाळी पाऊस झाला होता. आताही अवकाळीचा इशारा देण्यात आलाय.

कुठे पाऊस, तर कुठे उष्णतेची लाट; अनेक जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट हवामानाची नोंद



वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : मागील आठवड्यात राज्यभरातील अनेक भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. शेतकऱ्यांना अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. या अवकाळीने हातातोंडाशी आलेल्या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. कोकणात अवकाळीने आंबा, काजू पिकावरही परिणाम झाला आहे. या अवकाळीनंतर पुन्हा राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट हवामानाची नोंद करण्यात आली आहे. तसंच राज्यातील काही भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मुंबईत कसं असेल हवामान?

हवामान विभागाने पुढील २४ तासांसाठी मुंबई शहर आणि उपनगरांसाठी स्थानिक अंदाज नोंदवला आहे. शहर आणि उपनगरांमध्ये आकाश प्रामुख्याने निरभ्र राहिल. तर मुंबई उपनगरांमध्ये उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३६ष्टए आणि आणि किमान तापमान २४ष्टए च्या आसपास असेल.

राज्यभरात हवामानाचा अंदाज काय?

राज्यभरातील हवामान अंदाज विभागाने वर्तवला आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी उष्णता असण्याची शक्यता आहे. तर विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

काही भागात पावसाचा यलो अलर्ट

विदर्भात आज १० एप्रिल रोजी वादळी पावसाची शक्यता असून हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे. अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या भागात वादळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळं आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसंच ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसाने फळबागाची नुकसान, घरांची मोठी पडझड; राणा जगजीत सिंह पाटलांकडून पाहणी ष्दुसरीकडे कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यभरात सूर्य आग ओकत असून मोठ्या प्रमाणात तापमानाचा पारा वाढला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेलं आहे. अकोल्यात सर्वाधिक ४४.१ तापमान गेलं असून धुळे, जळगाव, अमरावतीमध्ये ४३ अंशांवर तापमान पोहोचलं आहे.

पुण्यात गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट, दोघांचा होरपळून मृत्यू; परिसरात खळबळ

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : पुण्यात गॅस सिलेंडर ब्लास्टची भीषण घटना घडली आहे. वारजे येथील माळवाडी, सर्वे नंबर ५२ गोकुळ नगर इथे एका पत्र्याच्या घरात मंगळवारी मध्यरात्री सिलेंडरचा भीषण स्फोट झाला. ९ एप्रिल रोजी, मंगळवारी १ वाजून ५६ मिनिटांनी सिलेंडरचा ब्लास्ट झाला. या स्फोटात दोन जणांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती आहे.

वारजे इथे गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट

या आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल दाखल झालं. स्फोट झाल्यानंतर आगीने रौद्र रूप धारण केलं. अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी दाखल होत सिलेंडरच्या स्फोटात लागलेली आग विझवण्याचं काम सुरू केलं. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करत गॅस सिलेंडरच्या स्फोटात लागलेली आग विझवली. यावेळी घरामध्ये दोन पुरुष जखमी अवस्थेत आढळले. त्या दोन जखमी व्यक्तींना पोलिसांच्या मदतीने रुग्णवाहिकेतून तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं. ससून येथे रवाना केलेल्या जखमींची नावं मोहन माणिक चव्हाण (वय वर्षे ४३), अतिश मोहन चव्हाण, (वय वर्षे २५) आहेत.

गॅस सिलेंडरच्या स्फोटात संपूर्ण घर उद्धवस्त

वारजे इथे पत्र्याच्या घरात झालेला सिलेंडरचा स्फोट इतका भीषण होता, की सिलेंडरचे सर्व भाग वेगळे झाले. सिलेंडरची वरची रिंगदेखील सिलेंडरपासून वेगळी होत उडाली. सिलेंडर पाच-सहा भागात फुटला असून या स्फोटात घरातील सर्व भांडी, इतर सामान, संपूर्ण घर उद्धवस्त झालं आहे. संपूर्ण घरात वस्तू उडून, त्या फुटल्या असून सामानाची राखरांगोळी झाली आहे. सिलेंडरच्या स्फोटात गॅसदेखील पूर्णपणे फुटला असून त्याचे विविध भागात तुकडे झाले आहेत. पत्र्यांचं बांधकाम असलेल्या घराचे पत्रे पूर्णपणे उडाले आहेत. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या स्फोटाचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र पोलीस घटनास्थळी पोहोचून सिलेंडरचा स्फोट नेमका कसा झाला, आगीच्या कारणाचा तपास केला जात आहे. या स्फोटात दोघांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पुणे जिल्ह्यात वर्षभरात १० हजार लेकींना लाभ; 'लेक लाडकी' योजनेच्या लाभार्थी संख्येत वाढ



वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे: मुलींच्या जन्माचे स्वागत करावे, त्यांच्या जन्मांचे प्रमाण वाढावे, यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'लेक लाडकी' योजनेला पुणे जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. एका वर्षात जिल्ह्यातील सुमारे दहा हजार लेकी 'लाडक्या' झाल्या असून, त्यापैकी आतापर्यंत आठ हजारांहून अधिक लेकींच्या खात्यात पाच हजार रुपयांची रक्कम जमा करण्यात यश आले आहे. उर्वरित लाभार्थ्यांना लवकरच लाभ देण्यात येणार आहे.

राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाने मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढावे. त्यांच्या जन्माचे स्वागत व्हावे, यासाठी गेल्या वर्षी एप्रिलपासून 'लेक लाडकी' योजना राबविण्यास सुरुवात केली. या योजनेंतर्गत मुलीच्या जन्मापासून ते वयाच्या १८ वर्षांपर्यंत तिच्या खात्यात सुमारे एक लाख एक हजार रुपयांची रक्कम टप्प्याटप्प्याने जमा होणार आहे. गेल्या वर्षी एप्रिलपासून ही योजना सुरू झाली असली, तरी गेल्या वर्षीच्या लोकसभा, विधानसभा निवडणुकींमुळे ब्रेक लागला होता. या योजनेला गती मिळाली नाही. आता काही महिन्यांपासून योजनेला गती मिळू लागली आहे.

लेक लाडकी' योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातून एका वर्षभरात नऊ हजार ७९६ अर्ज दाखल झाले आहेत. त्यापैकी सहा हजार ५७३ लेकींच्या खात्यात पाच हजार रुपयांचा मुलींच्या जन्मानंतरचा पहिला हप्ता जमा केला आहे. उर्वरीत १,६७६ लेकींचे अर्ज मंजूर केले असून, त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याची प्रक्रिया महिला व बालकल्याण विभागामार्फत सुरू आहे. सुमारे १,५५० अर्ज सध्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे एका वर्षात दहा हजार 'लेकी लाडक्या' झाल्या आहेत. महिला व बालकल्याण विभागाने 'लेक लाडकी' योजना ही मुलींच्या आरोग्य, शिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी सुरू केली आहे. मुलींचे शिक्षण पूर्ण झाल्यास त्या स्वावलंबी होतील. त्यामुळे मुलींच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि उच्च शिक्षण घेण्यासाठी ही योजना उपयुक्त आहे, याकडे महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष वेधले.

पुणे जिल्ह्यात शहर आणि ग्रामीण भागात सहा हजारांहून अधिक अंगणवाड्या आहेत. शहरी आणि ग्रामीण भागांतील अंगणवाडी सेविका; तसेच पर्यवेक्षिकांकडे अर्ज करता येईल. अर्ज पडताळणीसाठी शहर आणि ग्रामीण भागातील बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्याकडे जाईल. त्यानंतर अंतिम अर्ज मंजुरीनंतर मुलीच्या खात्यात पाच हजार रुपयांचा पहिला हप्ता जमा करण्यात येईल. पहिल्या हप्त्यानंतर मुलगी पाच वर्षांची झाल्यावर तिच्या खात्यात सहा हजार रुपयांचा दुसरा हप्ता जमा करता येईल.

या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी नुकताच महिला व बालकल्याण विभागाचा आढावा घेतला. त्या वेळी अंगणवाडी सेविकांना सूचना दिल्या आहेत. 'लेक लाडकी' योजनेसाठी मार्च महिन्यात तरतूद केली आहे. त्यामुळे अर्ज मंजुरीच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे.

'मुली लाभापासून वंचित राहणार नाहीत'

'पुणे जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना 'लेक लाडकी' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोणतीही मुलगी या लाभापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे; तसेच वेळेत या मुलींना लाभ द्या, अशा सूचना दिल्या आहेत,' असे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले.

'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५' यशस्वी करूया : पर्यटनमंत्री शंभूराज देसाई

महोत्सवात नेत्रदीपक लेझर शो, टेंट सिंटी, पर्यटकांसाठी साहसी खेळ, विविध परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; देशभरातील पर्यटन उद्योगातील तज्ज्ञ, ट्रॅव्हल एजंट्स आणि गाईड्स यांचा समावेश



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे प्रथमच 'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५' मोठ्या स्वरूपात साजरा होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि सातारा जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने हा पर्यटन महोत्सव २ ते ४ मे २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत २ मे २०२५ रोजी या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी पावनगड या निवासस्थानी पत्रकार परिषदेत दिली.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, 'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५' या पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्रीमंडळातील सदस्यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. सातारा जिल्ह्यात प्रथमच एवढ्या मोठ्या स्वरूपात पर्यटन महोत्सव होत आहे. या महोत्सवात पर्यटकांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाबळेश्वरमधील प्रसिद्ध वेण्णा तलावात महोत्सव कालावधीत नेत्रदीपक लेझर शो होणार आहे. गुजरातमधील कच्छ रणच्या धर्तीवर महाबळेश्वर येथे शंभरहून अधिक टेन्ट्स उभारण्यात येणार आहेत. पर्यटकांसाठी अत्याधुनिक निवासव्यवस्थेकरिता टेंट सिंटी उभारली जाणार आहे. वेण्णा तलावात पर्यटकांना साहसी खेळ आणि वॉटर स्पोर्ट्सचा आनंद घेता येईल. देशभरातील पर्यटन उद्योगातील तज्ज्ञ, ट्रॅव्हल एजंट्स आणि गाईड्स यांचा एक विशेष परिसंवाद देखील आयोजित करण्यात येणार आहे.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि पर्यटनदृष्ट्या त्यांचे योगदान यावर विशेष सादरीकरण देखील होणार आहे. ३ मे २०२५ रोजी महाबळेश्वरच्या साबळे रोड येथे एक विशेष सांस्कृतिक मिरवणूक काढण्यात येईल. या महोत्सवात राज्यातील प्रत्येक भागातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद पर्यटकांना घेता येईल. तसेच ४ मे २०२५ रोजी समारोप सोहळ्यापूर्वी महाराष्ट्रातील विविध पारंपरिक लोककला जसे की लावणी, गोंधळ, जागर, नाशिक ढोल इत्यादींचे सादरीकरण होणार आहे. तसेच, भव्य 'ड्रोन शो' या महोत्सवाचे मुख्य आकर्षण असणार आहे. महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार असून या महोत्सवात सहभागी झालेल्या उद्योजक, ट्रॅव्हल गाईड्स आणि स्थानिक कलाकारांचा यथोचित सत्कार केला जाणार आहे. कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा लवकरच जाहीर करणार आहोत या महोत्सवाला पर्यटनप्रेमींनी जरूर यावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

पालकमंत्री डॉ पंकज भोयर यांनी केले वैद्य कुटूंबबियांचे सांत्वन



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : कार अपघातात पोलिस हवालदार प्रशांत वैद्य यांच्यासह पत्नी, मुलगा व मुलगी यांचा दुर्दवी मृत्यू झाला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी गुरूवारी वैद्य कुटूंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

हिंगणघाट तालुक्यातील वडनेर ठाण्यात कार्यरत पोलिस हवालदार प्रशांत वैद्य रामनवमी निमित्त आयोजित महाप्रसादाच्या कार्यक्रमासाठी परिवारासह आपल्या मुळ गावी मांडगाव येथे गेले होते. मंगळवारच्या रात्री गावाहून परत येत असताना त्यांच्या कारला वराह आडवा आल्यामुळे गाडी टैंकर ला जावून धडकली होती. यात प्रशांत वैद्य, पत्नी प्रियंका, मुलगा प्रियांश व मुलगी माही उर्फ मनश्री यांच्या दुर्दवी मृत्यू झाला होता. त्यामुळे पंचक्रोशीत शोक पसरला होता.

गुरूवारी पालकमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी बॅचलर रोड जुनी स्टेट बँक कॉलेनी येथील वैद्य यांच्या घरी जावून परिवाराचे सांत्वन केले. यावेळी पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. सागर कवडे, सुनिल गफाट, नगरसेवक निलेश किटे आदी उपस्थित होते.

संपादकीय...

मौनं सर्वार्थ अ-साधनम्...

"जागतिक व्यापार संघटनेने निर्माण केलेली व्यवस्था शंभर टक्के निर्दोष नसेलही. पण ज्या देशाने ती निर्मिण्यास पुढाकार घेतला तोच देश ही व्यवस्था मोडू पाहतो" ही स्पष्टोक्ती एका लहानग्या देशाच्या प्रमुखांनी केली. ट्रम्प यांची एकतर्फी कृती, तिचे संभाव्य परिणाम, ते टाळण्यासाठीचे उपाय आदींबाबत सत्ताधाऱ्यांकडून मार्गदर्शन झाले असते तर बाजाराचा धक्का जरा सुसह्य ठरता. गेले काही दिवस भीती व्यक्त केली जात होती त्याप्रमाणे सोमवारी अखेर भारतीय भांडवली बाजाराने हाय खाल्ली आणि सुरुवातीलाच बाजाराचा निर्देशांक तीन हजारांहून अधिक अंकांनी लुडकला. वास्तविक हे गेल्या आठवड्यातच व्हायचे. पण टळले. त्या वेळी काही 'राष्ट्रप्रेमी' तज्ज्ञांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात कराची भीती अनाठायी आहे, आपल्यावर तितका काही परिणाम होणार नाही, आव्हान ही संधी इत्यादी इत्यादी सराईत पोपटपंची केली. ती किती अस्थानी होती ते आज बाजाराने आपल्या गडगडण्यातून दाखवून दिले. हे गडगडणे अर्थातच ट्रम्प यांच्या सर्व देशांस जशास तसे आयात कर लावण्याच्या निर्णयाचे परिणाम. हे आयात कर 'बोटीच्या बुडाचे भगदाड' या सोमवारच्या संपादकीयात नमूद केल्यानुसार दोन टप्प्यांत लागू होतील. पहिला टप्पा २ एप्रिलपासून अमलात आला. त्याअंतर्गत अमेरिकेशी व्यापार करणाऱ्या सर्व देशांस सरसकट १० टक्के इतका किमान आयात कर लावला जाऊ लागला. याचा दुसरा टप्पा ९ एप्रिलपासून लागू होईल. त्या वेळी प्रत्येक देशातील उत्पादने अमेरिकी बाजारपेठेत शिरताना त्यावर जशास तसे कर लावले जातील. जशास तसे म्हणजे हे देश अमेरिकी उत्पादनांना जितका कर लावतात तितकाच कर अमेरिका यापुढे त्या देशांतील उत्पादनांवर आकारणार. या हास्यास्पद 'जशास तसे' धोरणाची घोषणा झाल्यापासून अमेरिकी भांडवली बाजार घसरत असून गुंतवणूकदार जवळपास साडेसहा लाख कोटी (६.५ ट्रिलियन डॉलर्स) डॉलर्सची (समग्र भारतीय बाजाराचे एकत्रित मूल्य ४.५ ट्रिलियन डॉलर्स आहे) धूप अनुभवत आहेत. या घसरगुंडीस आता भारतीय बाजाराची साथ मिळाली. हे बाजार ट्रम्प यांच्यासमोर माना टाकत असताना काही घटनांतून पुढे काय वाढून ठेवलेले आहे याची चुणूक मिळते. यातील पहिली घटना खुद्द अमेरिकेत घडली. त्या देशातील प्रमुख शहरांत शब्दशः लाखो नागरिक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांचा सामुदायिक निषेध केला. युरोपातील काही देशांतही ही निदर्शने झडली. ट्रम्प यांच्या राज्यारोहणास जेमतेम चार महिने झालेले असताना त्यांच्याविषयी इतका संताप दाटून यावा आणि नागरिकांनी रस्त्यावर येऊन तो व्यक्त करावा यातून ट्रम्प यांच्या कृतीचे गांभीर्य लक्षात यावे. ट्रम्प निवडून आले आर्थिक प्रगतीच्या हमीवर. आपण सत्तेवर आल्यास प्रत्येक अमेरिकी नागरिकास चांगले दिवस येतील, त्यांची संपत्ती वाढेल, गुंतवणुकीवरील परतावा सशक्त होईल इत्यादी घसघशीत आश्वासने ट्रम्प यांनी निवडणूकपूर्व प्रचारांत दिली होती. प्रत्यक्षात मात्र उलटेच घडताना दिसते. संपत्तीवृद्धी राहिली बाजूला; आहे ती तरी राखली जाईल की नाही असा प्रश्न सामान्य अमेरिकी नागरिकांस पडला असून तो या निदर्शनांद्वारे व्यक्त होताना दिसतो. अमेरिकी अर्थव्यवस्थेत भांडवली बाजारास महत्त्व फार. एखाद्या कंपनीचे समभाग गडगडू लागले तर त्या कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांस पायउतार व्हावे लागते; इतके ते अमोल. नागरिकांच्या गुंतवणुकीवर योग्य परतावा देता न येणे हे पाश्चात्त्य देशांतील अक्षम्य पाप. पण येथे तर एखादी कंपनीच नव्हे तर बाजारच्या बाजार कोसळू लागला असून त्यास कारणीभूत असलेल्या अर्थ धोरणांसाठी राष्ट्राध्यक्षांस जबाबदार धरण्याची हिंमत अमेरिकी नागरिक दाखवू लागले आहेत. ही बाब कौतुकाची आणि त्या देशातील लोकशाहीच्या जिवंतपणाचीही. 'बाप दाखव नाही तर श्राद्धास बस' या म्हणीची आठवण यावी अशा त्या देशातील नागरिकांच्या सडेतोड दृष्टिकोनाचा सामना ट्रम्प यांस यापुढील काळात करावा लागेल, असे दिसते. पण ट्रम्प आणि त्यांच्या साथीदारांस याची फिकीर नसावी. कारण हे अध्यक्ष आपल्या 'क्रांतिकारी' धोरणांसाठी स्वतःच्या बुद्धिमत्तेस स्वतःच शाबासकी देण्यात मग्न! इतके की गडगडत्या बाजाराकडे लक्ष देण्याची गरजही त्यांस अद्याप वाटलेली नाही. उलट नागरिकांनी काही काळ कळ सोसावी असाच त्यांचा सल्ला आहे. अर्थात काही काळ म्हणजे नक्की किती हे काही सांगण्याची गरज त्यांस वाटत नाही. "अमेरिकेच्या तिजोरीत कोट्यवधी डॉलर्स येऊ लागलेले आहेत" असे ते म्हणाले. हे कोट्यवधी डॉलर्स कोठून येताना त्यांना दिसले याचेही उत्तर त्यांच्याकडे नाही. आपली कृती ही 'औषध' आहे असा दावा ट्रम्प करतात. जागतिक महासत्तेच्या प्रमुखास औषध आणि विष यांतील फरकही कळत नसेल तर हे 'औषध' प्राशन करावयाची वेळ आलेल्यांचे कठीणच आहे म्हणायचे. ट्रम्प आणि त्यांचे सवंगडी स्वकर्तृत्वाच्या भ्रमात इतके आहेत की उलट ते अन्य देशांनाच इशारा देताना दिसतात. "अमेरिकेच्या करवाढीच्या निर्णयास अन्य देशांनी अशाच करवाढीने प्रत्युत्तर देऊ नये" असा शहाजोग सल्ला ते देतात. अमेरिकेस जशास तसे उत्तर देण्याची हिंमत दाखवण्याचा पहिला मान चीनचा. चिनी उत्पादनांवरील कर वाढवण्याच्या अमेरिकेच्या निर्णयापाठोपाठ चीननेही अमेरिकी उत्पादनांवर अशीच करवाढ करण्याचा निर्णय घेतला. "चीनने अशा निर्णयाची घाई करायला नको होती" अशा अर्थाचे विधान ट्रम्प यांनी त्यावर केले. याचा अर्थ चीनने अमेरिकेसमोर हात बांधून यावे अशी काहीशी ट्रम्प यांची अपेक्षा असणार. चीनने तसे काही करण्याची इच्छाही दाखवली नाही आणि उलट अमेरिकेस जशास तसे प्रत्युत्तर दिले. म्हणजे एका बाजूला खुद्द अमेरिकी नागरिक मोठ्या प्रमाणावर ट्रम्प यांच्या धोरणांविरोधात जाहीर नाराजी व्यक्त करत असताना प्रतिस्पर्धी चीनसारख्या देशानेही ट्रम्प यांस आपल्या निर्णयाने जे काही सुनवायचे ते सुनावले. या पार्श्वभूमीवर आणखी एका व्यक्तीची कृती दखलपात्र ठरते. ही व्यक्ती म्हणजे सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग. त्यांनी दूरचित्रवाणीवरून राष्ट्रास संबोधण्याचा मार्ग पत्करला आणि नागरिकांस देशासमोरील आर्थिक आव्हानांचा सामना करण्यास सज्ज राहण्याचे आवाहन केले. वस्तुतः सिंगापूर आणि अमेरिका हा काही जगाने दखल घ्यावी इतका मोठा व्यापार नाही. खुद्द वोंग यांनाही याची कल्पना आहे आणि स्वतःच्या देशाच्या ताकदीबाबत ते उगाच भलत्या भ्रमात नाहीत. तरीही अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या कृतीमुळे जागतिक व्यापारयुद्धाचा धोका संभवतो आणि आपणही जागतिक व्यापार साखळीचा घटक असल्याने आपणासही त्याचा फटका बसेल इतक्या स्पष्टपणे वोंग स्वकीयांस आगामी धोक्याचा इशारा देतात. सिंगापूर ही खऱ्या अर्थाने लोकशाही नाही. तरीही त्या देशाच्या प्रमुखांस नागरिकांस विश्वासात घेण्याची गरज वाटते ही बाब व्यवस्थेच्या प्रामाणिकपणाची निदर्शक म्हणायला हवी. ते तेथेच थांबत नाहीत. ट्रम्प यांची कृती "आततायी, संकुचित बाजारपेठीय वृत्तीची निदर्शक आणि म्हणून धोकादायक आहे" अशी टीका करण्यास वोंग कमी करत नाहीत. "जागतिक व्यापार संघटनेने निर्माण केलेली व्यवस्था शंभर टक्के निर्दोष नसेलही. पण ज्या देशाने ती निर्मिण्यास पुढाकार घेतला तोच देश ही व्यवस्था मोडू पाहतो" असे नमूद करत वोंग आता जग मंदीच्या दिशेने निघाल्याचे सूचित करतात. इतक्या लहानग्या देशाच्या प्रमुखाने इतकी स्पष्ट भूमिका घ्यावी ही बाब निश्चितच कौतुकास्पद ठरते. त्या पार्श्वभूमीवर आपल्याकडील शांतता तशी धक्कादायक म्हणायची. ट्रम्प यांची एकतर्फी कृती, तिचे भारतावर होणारे संभाव्य परिणाम, ते टाळण्यासाठी सरकार करत असलेले उपाय आदींबाबत नागरिकांस सत्ताधाऱ्यांकडून मार्गदर्शन झाले असते तर बाजारपेठेचा धक्का जरा सुसह्य झाला असता. औरंगजेब, वक्फ, कबर इत्यादी विषयांवरील तज्ज्ञांनी नागरिकांचे जागतिक घडामोडींवरही प्रबोधन करावे. कळीच्या विषयावर मोक्याच्या वेळचे मौन सर्वार्थ साधनम नसते.

संकटमोचन- जय हनुमान

(१२ एप्रिलः चैत्र पौर्णिमा- हनुमान जन्मोत्सव.)



दरवर्षी चैत्र महिन्यातील पौर्णिमेला पवनपुत्र हनुमानजींची जयंती साजरी केली जाते. या शुभदिनी माता अंजनीच्या उदरातून हनुमानजींचा जन्म झाला. हनुमानाचे खऱ्या मनाने स्मरण केले तर ते प्रत्येक संकटात भक्तांचे रक्षण करतात. यंदा भगवान हनुमानाची जयंती आज शनिवार दि. १२ एप्रिल २०२५ रोजी साजरी केली जात आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर माहितीपूर्ण संकलित लेखात जरूर वाचा... संपादक.

हनुमान ऊर्फ मारुती ही रामायणातील एक लोकप्रिय व्यक्तिरेखा असून ते श्री रामांचे महान भक्त, दास, दूत मानले जातात. त्यांचा जन्म अंजनी या वानरीच्या पोटी अंजनेरी येथे झाला होता. हे गाव व या नावाचा डोंगरी किल्ला महाराष्ट्रातल्या नाशिक जिल्ह्यात आहे. मारुतीचे वडील केसरी. वीर मारुती हे अतिशय ताकदवान-महाबली होते. त्यांना अनेक शक्ती सिद्धी प्राप्त होत्या. लहानपणी त्यांना भूक लागली असल्याने ते सूर्याला फळ समजून त्याला पकडण्याच्या इच्छेने सूर्याकडे धाव घेऊ लागले. परंतु सूर्याला पकडताच त्यांचे हात सूर्याच्या आगीने चळाचळा कापू लागले त्यामुळे ते सूर्यापासून थोडे लांब झाले परंतु त्यांना तो खेळ च वाटू लागला ते सारखा सूर्याला पकडायचे व सोडून द्यायचे त्यामुळे सूर्यही त्यांना घाबरु लागला असे करत करत त्यांनी सूर्याला गिळले. ते बघून इंद्रासहित सर्व देवांना काळजी वाटू लागली. सूर्याला व पृथ्वीला वाचविण्यासाठी इंद्राने आपले वज्रा हे हनुमानांच्या दिशेने फेकले. त्या प्रहाराने हनुमानजींचे तोंड वाकडे झाले व ते बेशुद्ध पडले. नंतर देवांनी त्यांना भीतीपायी 'तुला आपल्या सर्व शक्तींचा विसर पडेल' असा शाप दिला.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

पुढे श्रीराम वनवासात असताना त्यांची व हनुमानाची भेट झाली. रावणाने सीतेचे अपहरण केले तेव्हा हनुमानाने उड्डाण करून लंका गाठली आणि श्रीरामांचा निरोप माता सीतेला पोचवला. याच वेळ जम्बुवन्ताने आठवण करून दिल्याने त्यांना त्यांच्या महापराक्रमी शक्तीची जाणीव झाली. ते वर्ष इ.स.पू. ५०६७ होते असे दिल्लीच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायंटिफिक रिसर्च येथील संशोधकांचे म्हणणे आहे. लंकाधिपती-रावणाच्या सैनिकांनी मारुतीला पकडून रावणासमोर उभे केले व त्याच्या शेपटीला कापड्याच्या चिंध्या बांधून त्यांना आग लावली. तेव्हा त्याने घरांघरांवर उड्या मारत आपल्या जळत्या शेपटीने पूर्ण लंकेला आग लावून लंका सोडली. परत जाऊन त्याने सीतेचे वर्तमान रामास कळवले. रामाने आपली वानरसेना लंकेला नेली आणि रावणाशी युद्ध केले. या युद्धात हनुमानाने रामाला मोठी मदत केली. जेव्हा लक्ष्मण बाण लागून बेशुद्ध पडला होता, तेव्हा त्याच्या उपचारांसाठी हनुमानाने उत्तराखंडातील द्रोणागिरी पर्वताकडे झेप घेतली. पर्वतावर त्याला हवी ती वनस्पती ओळखू न आल्याने त्याने सर्व द्रोणागिरी पर्वत उचलून आणला. त्या पर्वतावर आढळणाऱ्या संजीवनी नावाच्या वनौषधीने लक्ष्मण परत शुद्धीवर आला व त्याचे प्राण वाचले.

हनुमान हा सप्त चिरंजीवांपैकी एक चिरंजीव आहे, म्हणजे तो अजूनही जिवंत आहे, अशी मान्यता आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी, जेव्हा जेव्हा रामाचे नाव घेतले जाते, तेथे मारुती हजर असतो, असे म्हणतात. या माहितीच्या आधाराने कवी तुलसीदासाने मारुतीला शोधून काढले. मारुतीचा उल्लेख महाभारतातदेखील येतो. तो महाभारताच्या युद्धात अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर विराजमान होता. हनुमान जन्मभूमी ही अंजनेरी पर्वतावर त्र्यंबकेश्वर नाशिक हीच आहे. भगवान हनुमानाची आई अंजनी यांच्या नावावरून हे नाव पडले आहे. हनुमान जन्म स्थानाबाबत भौगोलिक पुरावे अंजनेरी पर्वतावर आजही उपलब्ध आहेत. त्र्यंबकेश्वर महात्म्य, नवनाथ भक्तिसार, गौतमी महात्म्य या पवित्र हिंदू धर्मग्रंथांमध्ये हनुमान जन्मस्थान हे अंजनेरी पर्वतच असल्याचे सिद्ध झालेले आहे. प्रसिद्ध मराठी संत-कवी एकनाथ यांच्या भावार्थ रामायणात असे म्हटले आहे. !! बजरंगबली की जय !!

!! हनुमान जन्मोत्सवाच्या सर्व बजरंगबली भक्तांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

हनुमान रुपे ...

फाडूनि छाती दावी
श्री राम वसतो ठाई
श्री राम कुठे म्हणूनि
मौक्तीक फेकूनि देई

ही कमाल
चातुर्याची
शोधली सीता
माई
लाभले शाश्वतस्थान
तयाला प्रभुच्या पाई

शक्तीची मस्ती नको
माज भीमाचा जाई
वानर सेना संघटना
कायवर्णावी चतुराई

जळेलंका वाजेडंका
दानवा आठवे आई
थरथरे विश्व अवघे
पळताना थोडी भुई

लक्ष्मणा प्रिय भाई
आणी सारी वनराई
ब्रह्मचारी चिरंजीव
तू वसतो ठाई ठाई

रामायणाचे पारायण
कुणी राम गुण गाई
नमस्कार करी रामा
हाक रामापर्यंत जाई

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

वसती ...

प्रभु
हृदयी वसती
फाडून दावी छाती
अनोखी अद्भुत ती
हनुमंत सार्थ भक्ती

फोडून पाहतो मोती
रामाची नाही वसती
अमोल असून मोती
बलभीमा वाटे माती

निष्ठूर दगडा वरती
राम नामाची वसती
हनुमानाने बांधला
सेतू सागरा वरती

शिष्याची गुरूवरती
कशी असावी प्रिती
दाखला दुसरा नाही
असा तिन्ही जगती

द्रोणागिरी हातावरी
घेऊन आला मारुती
जीव वाचवे वेळेवर
भक्ती खरीचं संपत्ती

रामनाम ओठ गाती
नमस्कार तुझे प्रति
करितो तुज विनंती
दान धर्म घडो हाती

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

!!! महामानव राहुल सांकृत्यायन यांना विनम्र अभिवादन !!!

(राहुल सांकृत्यायन जयंती व स्मृतिदिन विशेष)



असामान्य पांडित्यामुळे राहुलजींना महापंडित, महामानव, तसेच बौद्ध ग्रंथाच्या सखोल अध्ययनामुळे त्रिपिटकाचार्य अशी गौरवपूर्ण अभिधाने बहाल केली गेली. बौद्ध देशांतून तसेच रशिया आदी देशांतून त्यांना खुप मानसन्मान लाभले. भारतातही त्यांना सन्मान्य डॉक्टरेट आणि साहित्य अकादमी पुरस्कार दिला गेला. भारत सरकारने पद्मभूषण देऊन त्यांना गौरविले. अधिक जाणून घ्या श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजींच्या या लेखाद्वारे... संपादक.

राहुल सांकृत्यायन इराणमार्गे सन १९३७मध्ये रशियात गेले. ही त्यांची रशियाची दुसरी यात्रा होती. यावेळी लेनिनग्राड येथील ओरिएंटल इन्स्टिट्यूटमध्ये ते प्राध्यापक म्हणून गेले. या संस्थेच्या सचिव एलेना होत्या. एलेना- लोला याच पुढे त्यांच्या पत्नी झाल्या. त्यांना पुन्हा एकदा तिबेटात जायचे होते. म्हणून ते लवकरच भारतात परतले व त्यांनी तिबेटचा प्रवास केला. नंतर त्यांनी भारताच्या गरीब जनतेची सेवा करणे व किसान मजदूर राज्य भारतात आणणे यासाठी राजकाणात सक्रीय भाग घेतला. परिणामी ते एकूण अडीच वर्षे तुरुंगात होते. तुरुंगात त्यांनी लेखन करून हिंदी साहित्यात मोलाची भर घातली. वोल्गा से गंगा हा तुरुंगात लिहिलेल्या त्यांच्या नितांतसुंदर हिंदी कथांचा संग्रह आहे. भारतीय व परदेशी अशा १५ भाषांत या कथा अनुवादित झाल्या आहेत. पुन्हा त्यांना रशियाचे निमंत्रण आले. त्यानुसार सुमारे दोन वर्षे रशियात राहून ते भारतात परतले. सन १९४९मध्ये हैदराबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना बहाल करून त्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी त्यांच्या खाजगी सचिव नेपाळी महिला कमला त्यांच्या सोबत होत्या. पुढे त्याही त्यांच्या पत्नीच झाल्या. एलेनापासून त्यांना इगोर राहुलोविच तर कमलापासून जया व जेता ही संतती झाली.

लहानपणापासूनच त्यांनी सातत्याने विपुल लेखन केले. हिंदी- मेरी लद्दाख यात्रा, तिब्बतमे सवा वर्ष, मेरी यूरोप यात्रा, जापान आदी प्रवासवर्णने त्यांनी लिहिली. हिंदी कथा, कादंबरी क्षेत्रातही त्यांनी मोलाची भर घातली. कथा- सतमी के बच्चे, बहुरंगी मधुपुरी, कनैलाकी कथा इत्यादी. कादंबऱ्या- जीने के लिए, जय योधेय, विस्मृत यात्री इ. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जीवनाचे दर्शन घडते. केवळ प्राचीन परंपरेला न अनुसरता इतिहास संशोधनाच्या वृत्तीने त्यांनी आपल्या पात्रांचे जीवनचरित्र, सामाजिक परिस्थिती इत्यादींचे चित्रण केले. संस्कृत-प्राकृतादी प्राचीन भाषांतील ग्रंथ त्यांनी हिंदीत भाषांतरित करून हिंदी भाषेला अधिक संपन्न केले. त्यांच्या ग्रंथाची एकूण संख्या १५० वर भरते. धर्म, तत्त्वज्ञान, राजनीती, इतिहास, पुरातत्त्व, समाजशास्त्र, प्राच्यविद्या, व्याकरण, संस्कृती, भाषा-साहित्य, कोश, विज्ञान, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, कथा-कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, देशदर्शन इत्यादी विषयांवर व प्रकारांत त्यांनी दर्जेदार लेखन केले. हिंदीशिवाय त्यांनी संस्कृत, अपभ्रंश व तिबेटितही ग्रंथ लिहिले व अनेक प्राचीन संस्कृत ग्रंथ उत्तम प्रकारे संपादून प्रकाशात आणले. त्यांच्या लेखनाचा आणि विद्वत्तेचा आवाका फार विशाल असल्याचे त्यांच्या प्रकाशित ग्रंथांच्या यादीवर सहज नजर टाकली, तरी लक्षात येईल.

राहुल सांकृत्यायन हे जागतिक कीर्तीचे भारतीय महापंडित व लेखक होते. त्यांचा जन्म उत्तर प्रदेशात कनैला, जि. आझमगढ या गावी दि.९ एप्रिल १८९३ रोजी एका ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव केदारनाथ व कुलनाम पांडे होते. माता पिता कुलवंती व गोवर्धन होत. बौद्ध धम्माची दिक्षा घेतल्यानंतर केदारनाथांनी राहुल हे नाव धारण केले व सांकृत्य हे त्यांचे गोत्र असल्याने ते राहुल सांकृत्यायन या नावाने प्रख्यात झाले. वयाच्या पंधराव्या वर्षी उर्दू मिडल स्कूल परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते घरातून पळून गेले. वयाच्या अकराव्या वर्षीच त्यांचा विवाह झाला होता, पण हा अजाणतेपणी झालेला विवाह म्हणून त्यांनी त्याचे बंधन मानले नाही. अठराव्या वर्षी ते वाराणसीला गेले व तेथे त्यांनी संस्कृत आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे अध्ययन केले. त्यांना केवळ विद्वत्ता नको होती, तर साधू व्हायचे होते. त्यांची विरक्त वृत्ती पाहून छप्रा गावच्या एका महंताने त्यांना वैष्णव धर्माची दीक्षा दिली. त्यांचे पंथीय नाव रामोदार साधू असे ठेवले. काही काळ तेथील मठपती म्हणूनही त्यांनी काम पाहिले. नंतर ते छप्रा गाव सोडून दक्षिण भारताच्या तीर्थयात्रेस गेले.

त्यांनी सबंध भारताचा प्रवास केला. त्यांच्या वृत्तीत स्वतःस झोकून देण्याची उत्कटता होती. एकदा मनाने घेतलेल्या गोष्टींकडे ते उत्कटपणे धाव घेत व तिचा संपूर्ण व सखोल वेध घेत. दक्षिण भारताची तीर्थयात्रा सोडून ते अयोध्येस आले व त्यांनी संस्कृत पाठशाळेत वेदांताचा सखोल अभ्यास केला. अयोध्येतच ते आर्यसमाजाकडे आकृष्ट झाले व त्यांनी दयानंदांच्या सत्यार्थ प्रकाशाचे सखोल अध्ययन केले. आर्यसमाजाच्या विचारांचा त्यांच्यावर खुपच प्रभाव पडला. अयोध्येहून ते आग्र्यास गेले व तेथील आर्यसमाजाच्या विद्यालयात दाखल झाले. ख्रिस्ती व इस्लाम धर्मीय आपल्या धर्मप्रसारासाठी आटोकाट प्रयत्नच करतात व हिंदूंवर आघात करतात, म्हणून त्यांनी विरक्त, विद्वान व संघटनाकुशल अशा हिंदू तरूणांची मिशनरी त्यागीवृत्तीने काम करणारी संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. रशियात सन १९१७मध्ये झालेल्या क्रांतीने ते प्रभावित झाले आणि क्रांतीकडे व साम्यवादाकडे आकृष्ट झाले. त्यांनी साम्यवादी तत्त्वज्ञान सखोलपणे अभ्यासले. बाइसवी सदी हा त्यांचा ग्रंथ याचेच फलित होय. मार्क्सवादावर त्यांनी बरेच लेखन करून त्याचा प्रचारही केला. साम्यवाद ही क्यो? सोविएत न्याय, मानव समाज, आजकी समस्याएँ, आजकी राजनीति आदी त्यांचे राजनीतीवरील उल्लेखनीय ग्रंथ होत. नंतर ते बौद्ध धर्माकडे आकृष्ट झाले. त्यांनी पाली भाषा-साहित्याचे व बौद्ध धर्म-तत्त्वज्ञानाचे सखोल अध्ययन केले. लखनौ येथील बोधानंद भिक्षू यांच्याशी परिचय झाल्यावर त्यांनी त्यांच्यासमवेत अनेक बौद्ध तीर्थक्षेत्रांची यात्रा केली. त्यांना यात्रेत परदेशी भिक्षूही भेटले. भारताबाहेरही बौद्ध धर्माचा प्रसार बराच आहे, असे समजल्यावर त्यांनी त्या त्या देशांच्या भाषा व लिपी यांचा अभ्यास केला. उर्दू, हिंदी, संस्कृत-प्राकृत, पाली-अपभ्रंश, इंग्रजी, अरबी, फार्सी, फ्रेंच, तमिळ, कन्नड, चिनी, तिबेटी, जपानी, रशियन, आदी भाषांवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते.

बौद्धधम्माकडे ते अधिकाधिक आकृष्ट झाले आणि त्यांनी सन १९३० साली श्रीलंकेत जाऊन बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. साम्यवाद व बौद्ध धम्मतत्त्वज्ञान या दोहोंच्या समन्वयाने त्यांचे विचार समतोल व अधिक तेजस्वी बनले. सनातन धर्माकडून आर्यसमाजाकडे तेथून साम्यवादाकडे तेथून बौद्ध धम्माकडे व शेवटी मानव धर्माकडे असा त्यांच्या वैचारिक प्रवास झाला. मध्यंतरी सन १९२१मध्ये त्यांनी गांधीजींच्या हाकेस प्रतिसाद देऊन स्वातंत्र्याच्या आंदोलनात उडी घेतली. तिथून सहा महिने आणि सन १९२५ पर्यंत दोन वर्षे त्यांनी तुरुंगवासही भोगला. तुरुंगात त्यांचा व्यासंग व लेखन सुरूच होते. नंतर दोन वर्षांनी ते बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी संस्कृतचे अध्यापक म्हणून श्रीलंकेत गेले. नंतर ते अधिक सखोल अध्ययनासाठी नेपाळमार्गे तिबेटात ल्हासा येथे गेले. तिबेटमधून ते सन १९३०साली पुन्हा श्रीलंकेत गेले. नंतर बौद्ध धर्मप्रचारासाठी ते दोन वर्षांत लंडन येथे व तेथून यूरोपात गेले. यूरोपात ते सुमारे तीन महिने होते. सन १९३३मध्ये ते पुन्हा युरोपातून श्रीलंकेत गेले व तेथून भारतात परतले. तेथून पुन्हा दुसऱ्यांदा जमू-काश्मीरमार्गे लडाख येथे गेले. या प्रवासात त्यांनी सुत्तपिटकातील प्रख्यात ग्रंथ मज्झिमनिकायचा हिंदीत अनुवाद केला. नंतर त्यांनी पुढे धम्मपद, विनयपिटक, दीघनिकाय यांचे हिंदीत अनुवाद केले. तसेच आनंदकौशल्यायन व जगदीश काश्यप यांच्या सहकार्याने खुद्दकनिकायचे अकरा ग्रंथ देवनागरीत आणले. तसेच त्यांनी बुद्धचर्या आणि महामानव बुद्ध हे बुध्दाचे चरित्र असलेले ग्रंथ हिंदीत लिहिले.

बिहारात १९३४मध्ये मोठा भूकंप झाला. तेव्हा भूकंप ग्रस्तांच्या सेवेसाठी ते बिहारमध्ये राहिले. नंतर ते पुन्हा सिक्कीममार्गे तिबेटात ल्हासा येथे गेले. तिबेटमध्ये जाण्याचा त्यांचा हेतू भारतात उपलब्ध नसलेल्या संस्कृत ग्रंथाचा शोध घेणे, हा होता. हे ग्रंथ मूळ वा अनुवाद रूपात तिबेटमध्ये उपलब्ध असावेत, अशी त्यांची धारणा होती. नंतर ते पूर्वेकडील बौद्ध धर्मीय देशांत- ब्रह्मदेश, थायलंड, जपान, कोरिया येथे गेले. सन १९३५ मध्ये ते जपानला पोहोचले. या यात्रेवरून परतल्यावर ते परत नेपाळमार्गे तिबेटात गेले. या तिबेट यात्रेत त्यांना अनेक अत्यंत महत्त्वाचे प्राचीन ग्रंथ मिळाले व ते त्यांनी भारतात आणले. त्यांनी तिबेटी ग्रंथ कंजूर- मूळ बुद्धवचनांचे अनुवादग्रंथ, संख्या १,१०८; तंजूर- अनुवादित भाष्यग्रंथ; संख्या ३,४५८ आहे. तसेच अनेक संस्कृत हस्तलिखितांच्या छायाप्रती वा नकला करून आणल्या. हा महत्त्वपूर्ण प्राचीन ग्रंथसंभार पाटणा येथील बिहार रिसर्च सोसायटी व के.पी. जयस्वाल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयांत जतन करून ठेवला आहे. त्यांनी तिबेटातील मठांतून भारतातून नष्ट झालेल्या प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या आणलेल्या छायाप्रतींत वसुबंधुकृत अभिधर्मकोश-भाष्य, अभिधर्मदीप महासांघिकांचे प्रतिमोक्षसूत्र, अर्थविनिश्चयसूत्र टीकेसहीत दुर्वेकृत धर्मोत्तर प्रदीप, प्रमाणवार्तिक भाष्य, योगाचारभूमी, विनयसूत्र व त्यावरील वृत्ती आणि टीका वगैरेंचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

मसूरी येथील वास्तव्यात त्यांनी मध्य एशियाका इतिहास- २ भाग, तसेच 'हिमालय परिचय' योजनेच्या अंतर्गत अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. सन १९५४मध्ये त्यांनी कार्ल मार्क्स, लेनिन, स्तालिन आणि माओत्सेतुंग यांची चरित्रे लिहिली. मेरी जीवनयात्रा हे त्यांचे आत्मचरित्र होय. ते विमानाने चीनला गेले. तेथे ते साडेचार महिने होते. भारतात परतल्यावर श्रीलंकेच्या निमंत्रणावरून विद्यालंकार विद्यापीठात ते तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून १९५९ मध्ये गेले. शेवटी प्रकृत्ती बरी नसल्याने ते भारतात परतले. त्यांना स्मृतीभ्रंश जडला व नंतर त्यातच दार्जिलिंग येथे त्यांचे दि. १४ एप्रिल १९६३ रोजी निधन झाले.

!! त्यांच्या अचाट साहित्यकृतीला जयंती व पुण्यस्मरण निमित्त विनम्र अभिवादन !!

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठः वन क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ प्रस्ताव तयार करावा : सभापती प्रा.राम शिंदे

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे काम आणि विद्यापीठ इमारत १५ मे पर्यंत पूर्ण करण्याच्या बैठकीत सूचना

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ क्षेत्राच्या चारही बाजूस वनविभागाचे आरक्षण असल्याने येण्या-जाण्यासाठी रस्ता बांधण्यासंदर्भात अडचणी निर्माण झाल्या आहेत. सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी येत्या आठ दिवसात वनविभाग, महसूल आणि विद्यापीठातील अधिकारी यांच्याशी समन्वयातून कार्यअहवाल तयार करावा. विद्यापीठातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळा निर्मितीचे कार्य १५ मे, २०२५ पर्यंत पूर्ण व्हावे तसेच ८०/२० सूत्रानुसार विद्यापीठातील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, असे निर्देश यावेळी विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

विधानभवन येथे सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या संदर्भातील प्रश्नांसंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी सभापती प्रा. शिंदे बोलत होते. बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, वनविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कुलगुरु प्रा.प्रकाश महानवर, दूरदृष्यप्रणालीद्वारे सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांच्यासह तीनही विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दिनांक ३१ मे, २०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती आहे. या संदर्भातील उपक्रम आणि कामे वेळेत पूर्ण व्हावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या पुतळ्याचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण होणे अपेक्

जिल्हास्तरीय कोडींग स्पर्धेत मध्ये धोंडेवाडी शाळेचे घवघवीत यश; श्री जयवंत जाधव यांचा जिल्ह्यात पाचवा क्रमांक

खंडाळा ■ संदेश चव्हाण



खंडाळा : शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांनी २१ व्या शतकातील कौशल्य आत्मसात करावी व त्याबरोबरच मुलांमध्ये संगणकीय विचार ,सहयोग ,सांघिककार्य तार्किक विचार आणि कोडिंग यांचे ज्ञान अवगत होण्यासाठी पुणे जिल्हा प्रशिक्षण संस्था पुणे ,जिल्हा परिषद पुणे, लीडरशिप फॉर इक्विटी संस्था व ?मेझॉन फ्युचर इंजिनियर यांच्या विद्यमाने २०२४ /२०२५ मध्ये कोडींग प्रशिक्षण शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आले होते.

कोडींग प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील शिक्षकांसाठी ऑनलाईन ब्लेंडेड कोर्स घेण्यात आला होता. यातून शिक्षक कम्प्युटेशनल थिंकिंग मधील लुपिंग सिक्वेसिंग यांसारख्या कोडींग संकल्पनांचा अभ्यासक्रमामध्ये वापर या घटकावर कोर्सची निर्मिती बनवण्यात आली होती. यासाठी जिल्ह्यातून १३०० शिक्षकांनी नोंदणी केली होती यापैकी जिल्ह्यातून सर्वोत्कृष्ट २० शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये भोर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा धोंडेवाडी येथील मुख्याध्यापक श्री जयवंत जाधव यांची जिल्हास्तरावर पाचव्या क्रमांकावर निवड झाली असून त्यांनी उत्कृष्टरित्या कोडींग च्या सर्व कौशल्यांचा वापर करून कोर्स वेळेत पूर्ण केला .भोर तालुक्यातून निवड झालेले ते एकमेव शिक्षक आहेत.

सदर कार्यक्रमाचा पुरस्कार वितरण जिल्हा परिषद पुणे येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गजानन पाटील साहेब उपशिक्षणाधिकारी मोमीन मॅडम व गच्चे साहेब ,वैशाली बच्छाव, साईप्रसाद, तुषार झा श्रुती कुलकर्णी ,महेश म्हेत्रे यांच्या उपस्थितीत जयवंत जाधव यांना लॅपटॉप व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

धोंडेवाडी शाळेत कोडींग चा उपक्रम सुरू असून इयत्ता तिसरी ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी ब्लॉक बेस कोडींग करतात. स्वतःचे नाव ?निमेशन करून प्रकल्प तयार करतात .

जयवंत जाधव व सविता तनपुरे या दोन्ही शिक्षकांचे भोर तालुका गटशिक्षणाधिकारी राजकुमार बामणे ,विस्ताराधिकारी सुषमा पाटील, केंद्रप्रमुख अंजना वाडकर ग्रामपंचायत सदस्य सोपान धनावडे ,विठ्ठल धोंडे, सीमा शिरगावकर ,ध्रुव प्रतिष्ठान अध्यक्ष राजीव केळकर, माध्यमिक विद्यालय आंबवडे मुख्याध्यापक सुनील थोपटे ,रघुनाथ पारठे, अंकुश भिलारे ,दत्तात्रय सुतार , अनिता पवार यांनी अभिनंदन केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व हनुमान जयंती उत्सव उत्साहात साजरा

आंबेगाव ■ संतोष गावडे



आंबेगाव : टाव्हरेवाडी ता. (आंबेगाव)(ता.८)श्री हनुमान जयंती उत्सव सोहळ्यानिमित्त श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मंगळवार दिनांक ८/४/२०२५ ते दिनांक शनिवार दिनांक १२/४/२०२५ अशा पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती मा. संचालक बाळासाहेब टाव्हरे यांनी दिली.

मंगळवार दिनांक ८ रोजी सकाळी ९ ते सकाळी ११ या दरम्यान श्री हनुमान मूर्तीची मिरवणूक संपन्न होणार आहे. बुधवार दिनांक ९ रोजी संपूर्ण दिवस वेदमूर्ती योगेश काका कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली होमहवन संपन्न. गुरुवार दिनांक १० रोजी सकाळी सात ते सकाळी अकरा वाजता मूर्ती स्थापना व त्यानंतर अन्नप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर सायंकाळी चार ते सहा या वेळेत हनुमान प्रसादिक भजनी मंडळ टाव्हरेवाडी यांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार दिनांक ११ रोजी सायंकाळी सहा ते रात्री आठ वाजता आळंदी येथील कीर्तनकार ह भ प रामेश्वर महाराज भोजने यांचे हरिकीर्तन संपन्न होणार असून कीर्तन संपल्यानंतर एस कुमार केटरर्सचे मालक संदीप वायाळ यांच्या माध्यमातून उपस्थित भावीक भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळणार आहे. तर शनिवार दिनांक १२ रोजी श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या नियोजित कार्यक्रमासाठी टाव्हरेवाडी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ टाव्हरेवाडी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

घोडेगाव येथे महात्मा फुले यांना जयंती निमित्त अभिवादन



भीमाशंकर ■ महंमद मुलाणी

भीमाशंकरः म. फुले यांचे साहित्याचे वाचन व्हावे - डॉ. अमोल वाघमारे महात्मा ज्योतिराव फुले यांची १९७ वी जयंती घोडेगाव येथे साजरी करण्यात आली.

या जयंती निमित्ताने आदिम संस्कृती, अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्राच्या वतीने घोडेगाव येथे महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी आदिम संस्थेचे डॉ.अमोल वाघमारे यांनी महात्मा फुले यांनी स्त्रियांविषयी व एकूणच संपूर्ण मानवजातीसाठी जे कार्य केले आहे. याविषयीची माहिती उपस्थिताना दिली.

महात्मा फुले यांचे एकूण सामाजिक परिवर्तनामध्ये फार मोठे योगदान राहिलेले आहे . त्यांचे साहित्य आपण सर्वांनी वाचले पाहिजे असे त्यांनी यावेळी नमूद केले.

या प्रसंगी किसान सभेचे राजू घोडे, आदिम. संस्थेचे,डॉ. अमोल वाघमारे, कमल बांबळे, सुप्रिया मते, दिपाली खामकर, ज्ञानसरिता अभ्यासिकेचे विद्यार्थी, यश पारधी,किरण लोहकरे आदी उपस्थितीत होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया मते व प्रास्ताविक कमल बांबळे तर आभार दिपाली खामकर यांनी मानले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजने अंतर्गत भावना पब्लिक स्कूल, देगाव या शाळा तृतीय क्रमांकाने सन्मानित



रिसोड ■ प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत भावना पब्लिक स्कूल देगाव या शाळेने तालुकास्तरावर तृतीय क्रमांकाने पटकावला.

सदर सत्कार समारंभ पी. एम.श्री जिल्हा परिषद शाळा सवड या ठिकाणी संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षणाधिकारी (प्राथ) श्री.भुसारी साहेब होते तसेच डाएट चे प्राध्यापक श्री. कडाळे सर,गटविकास अधिकारी श्री. लहाने सर, गटशिक्षण अधिकारी कोकाटे सर, गटशिक्षण अधिकारी श्री. गजानन बाजड, केंद्रप्रमुख श्री. भिसडे सर यांच्या हस्ते बक्षिस वितरण संपन्न झाले.

शाळेच्या वतीने प्राचार्य श्री. आनंद रवींद्र मरळगोईकर यांनी पुरस्कार स्वीकारला.

या पुरस्कारा नंतर शाळेच्या अध्यक्षा मा. आमदार भवनाताई गवळी, संचालक मंडळ मा. साधनाताई गवळी, मा. कल्पनाताई गवळी, मा. संजनाताई गवळी, मा. कुलदीप पाटील सर यांनी सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

श्री सरस्वती भुवन प्रशाला ,गोंदेगाव येथे महात्मा ज्योतिराव फुले जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन



दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे

सोयगाव : सोयगाव तालुक्यातील गोदेंगाव येथील सरस्वती भुवन प्रशालेत महात्मा जोतीराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली .

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ योगेश इंगळे तर प्रमुख प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एस.माळी तसेच उपमुख्याध्यापक एस.आर.दाभाडे पर्यवेक्षक जी.जी.ढाकणे होते. प्रसंगी मान्यवरांनी माल्यार्पण व प्रतिमा पूजन करून महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणांतून क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे संयोजन सेवाजेष्ठ शिक्षक डी व्ही खैरणार यांनी केले.श्री माळी यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय,अस्पृश्यता,रूढी-कुप्रथा, अंधश्रध्दा निवारण कार्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमा या प्रसंगी प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी यांची उपस्थिती होती.कार्यक्रम यशस्वीतेसाठी इ. ६ वी(क) च्या सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

स्व.श्री.नैलेश मेहता जन्मदिनानिमित्त पुनवडी येथे शालेय साहित्य वाटप



खंडाळा ■ गणेश गुरव

खंडाळा : जावली तालुक्यातील पुनवडी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने मदत करून सामाजिक बांधिलकी जोपासणारे दातृत्वशील व्यक्तिमत्व स्व.श्री.नैलेशभाई शांतीलाल मेहता (मालक,महालक्ष्मी मेडिकल स्टोअर्स मुंबई) यांच्या जन्मदिनानिमित्त श्री संतोष पांडुरंग पार्टे, महालक्ष्मी मेडिकल स्टोअर्स मलबार हिल यांच्या सौजन्याने पुनवडी शाळेतील सर्व विद्यार्थी व पालक यांना मिष्टान्न भोजन तसेच विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी केडंबे केंद्राचे केंद्रप्रमुख श्री हंबीरराव जगताप साहेब,सरपंच श्री सुरेश पार्टे,श्री.संतोष पार्टे यांच्या मातोश्री श्रीम.गिताबाई पार्टे,एश्ण अध्यक्षा सौ.कविता पार्टे,उपाध्यक्ष श्री रामचंद्र उंबरकर, तुकाराम पार्टे,बंडू पार्टे, किसन पार्टे, सुरेश साहेबराव पार्टे, अश्विनी पार्टे, मनिषा पार्टे,अश्विनी भिलारे,वाटंबे शाळेचे मुख्याध्यापक श्री सचिन ठोंबरे सर तसेच ग्रामस्थ,पालक उपस्थित होते. केंद्रप्रमुख हंबीरराव जगताप यांनी स्व.नैलेश मेहता यांना प्रथम आदरांजली वाहून संतोष पार्टे करीत असलेल्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. श्रीमती गीताबाई पार्टे यांचा यावेळी शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला.उपस्थितांचे स्वागत व आभार मुख्याध्यापक विशाल दळवी यांनी मानले.

केंद्रीय नौकानयन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्यासोबत भारतीय मजूर संघाची बैठक संपन्न



दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे

उरण : नवी दिल्ली येथे केंद्रीय नौकानयन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्यासोबत कामगारांच्या विविध प्रश्नावर भारतीय मजदूर संघाची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये मागील वेतन करारातील कामगारांच्या हिताचे पेंडिंग राहिलेले प्रश्न तसेच कॉन्ट्रॅक्ट लेबर यांचे सेवानिवृत्तीचे वय वर्ष साठ करावे आणि विविध पोर्ट मधील कामगारांच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली.या बैठकीत भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिमते, पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील ,महासंघाचे अध्यक्ष श्रीकांत राय, संतोष प्रधान विविध कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र सरकारने महावितरण मार्फत जनतेचे चालवलेले आर्थिक शोषण व दिशाभूल तात्काळ थांबविण्याबाबतची मागणी : ॲड. कांचन कन्होजा धोंडीराम खरात यांनी केली निवेदन सादर

लोणंद ■ पांडूरंग कुंभार



लोणंद : वीज वितरण ने २०१२-१३ पासून बसवलेले नवीन टेक्नॉलॉजीने बनविलेले वीज मीटर बसविले होते. तेव्हा सुद्धा सरकारने हेच सांगितले होते की, हे वीज मीटर अचूक व योग्य बिल ग्राहकांना देतील. एवढा मुबलक जनतेचा पैसा खर्च करून त्यात महाराष्ट्र सरकारवर २०२४- २५ अखेरीस प्रत्यक्षात कर्जाचा बोजा ८ लाख ३९ हजार कोटींवर गेला असताना २०१२ - १३ ला बसविलेले मीटर सक्षम असताना देखील पहिल्यांदा टेंडर काढून प्री- पेड मीटर बसविण्याचे आदेश दिले. म्हणजेच प्री- पेड मीटरची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली असतील व काही ठिकाणी हे मीटर बसविले असतील. त्यातच आत्ताच्या अधिवेशनात मा. मुख्यमंत्री साहेबांनी अशी घोषणा केली की, प्री- पेड मीटर कोणालाही दिले जाणार नाहीत. आता नवीन टो. ओ. डी. वीज मीटर बसविले जाणार आहेत. घोषणा करून दहा-बारा दिवस सुद्धा झाले नाहीत आणि काही सरकारी कार्यालये व काही जिल्ह्यात जोडणीला सुरुवात देखील झाल्याची बातमी आली हे विशेषच, एवढ्या कमी वेळेत कसे नवीन मीटर तयार होऊ शकतात? हे समजणे कठीण आहे. मीटर नेमका कोणता प्री-पेड की ग्राहकांची दिशाभूल करून नवीन टो. ओ. डी. मीटरच्या नावाखाली प्री- पेड मीटर बसविणार आहेत का? तसेच महावितरण म्हणते की, ग्राहकांना आर्थिक भुर्दंड होणार नाही. परंतु हे पैसे जनतेच्याच करातून किंवा राज्य सरकारवर कर्ज काढून दिले जाणार ना? त्यामुळे ग्राहकांची दिशाभूल तात्काळ थांबवावी.

तसेच टो.ओ.डी. मीटर द्वारे दिवसाच्या व रात्रीच्या वापराचे रीडिंग वेगवेगळे देणार त्यानुसार ग्राहकांना वीज दिले देणार आहात का? आणि असे असेल तर चक्क विज ग्राहकांची दिवसाढवळ्या राज्य सरकारकडून गरिबांची लुट होणार आहे. हे स्पष्ट दिसून येत आहे. यात राज्य सरकार द्वारे सक्तीने हे मीटर बसविलेच पाहिजे ही सक्ती का? हे म्हणजे एखाद्या उद्योगपतीला व त्यांच्या सबकॉन्ट्रॅक्टदारांना स्पष्ट फायदा देण्यासाठी जनतेची लुबाडणूक होणार आहे हे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे मा. राष्ट्रपती मॅडम व मा. राज्यपाल साहेब यांना विनंती की, या नवीन मीटर बसविण्यावर तात्काळ बंदी घालण्याचे आदेश करावेत तसेच मे. मुख्यन्यायाधीश साहेब हायकोर्ट मुंबई यांना विनंती की, स्पष्ट दिसत आहे की, महाराष्ट्रावर कर्जाचा बोजा वाढणार आहे, त्याचबरोबर वीज ग्राहकांची लुट देखील होणार आहे. याचा आपण विचार करून सुमोटो दखल घेऊन ग्राहकांचे व राज्याचे रक्षण होईल असे आदेश करावेत. त्याचबरोबर सर्व मान्यवरांना विनंती की, पहिले मीटर सक्षम आहेत हे आपणच सांगत होता. मग हे नवीन मीटर बसविण्यासाठी राज्य व जनतेच्या डोक्यावर कर्जाचा बोजा कशासाठी? त्यामुळे नवीन वीज मीटर बसविण्याचे आदेश तात्काळ रद्द करावेत. अशी मागणी फलटण मधील सामाजिक कार्यकर्त्या ॲड. कांचनकन्होजा धोंडीराम खरात ताई यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

सी.एस.टीचर्स मेंटॉर प्रोगॅमचे बक्षिस वितरणमध्ये गोविंदनगर शाळेचे सुजित फलके उत्कृष्ट पुरस्कार

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगाव : ॲमेझॉन फ्युचर इंजीनियरिंग व लीडरशिप फॉर इक्विटी यांच्याद्वारे आयोजित , सी. एस. टीचर्स मेंटॉर प्रोग्रॅमचे बक्षीस वितरण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुनिता राठोड प्रादेशिक विद्या प्राधिकरण प्रमुख या होत्या.

सदर कार्यक्रमासाठी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था प्राचार्य सान्वी देशमुख,जयश्रीताई चव्हाण शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा छत्रपती संभाजीनगर, वरिष्ठ अधिव्याख्याता प्रोग्राम नोडल अधिकारी डॉ.प्रकाश मांन्टे,प्रकल्प संचालक डॉ. सोज्वल जैन आदी उपस्थित होते.

मागील एक वर्षापासून फिरकी ?प वर शिक्षक बंधू-भगिनींसाठी टीचर मेंटॉर प्रोग्राम सुरू होता. त्यात स्क्रॅच बेस्ट कोडींग प्रोग्राम शिकवण्यात आले. दैनंदिन अध्यापनात स्क्रॅच कोडींग प्लॅटफॉर्म द्वारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता संवर्धनासाठी ?मेझॉन फ्युचर इंजीनियरिंग व लीडरशिप फॉर इक्विटी द्वारे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आला.१००२ शिक्षकांनी यात नोंदणी केली होती. त्यापैकी ५४१ शिक्षकांनी उत्कृष्टतेने कोर्स पूर्ण करून प्रमाणपत्र मिळवले. सर्व प्रोजेक्टचे गुणांकन करून सर्वोत्कृष्ट २० स्पर्धक निवडून गौरवण्यात आले. यात सोयगाव तालुक्यातील चंद्रकांत कांबळे , शाळा बोरमाळ तांडा प्रथम क्रमांक तर योगेश पाटील , शाळा बनोटी तांडा द्वितीय क्रमांक मिळवला तर जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार खुलताबाद तालुक्यातील कणकशीळ जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक विशाल भास्कर टिप्रमवार यांनी मिळवला. तसेच उत्कृष्ट शिक्षक प्रशिक्षक पुरस्कार सोयगाव तालुक्यातील सुजित फलके सिल्लोड तालुक्यातील श्री प्रतीक वाघ यांना प्रदान करण्यात आला.१३ लॅपटॉप ,२३ टॅबलेट ,३एलेक्सा डिवाइस आणि प्रमाणपत्र असे भरगच्च बक्षिसांचे स्वरूप होते. हे सर्व बक्षीस हे एकूण २५ जिल्हा परिषद शाळांना देण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात शिक्षणाधिकारी जयश्रीताई चव्हाण यांनी ?मेझॉन फ्युचर इंजिनिअरिंगच्या सगळ्या टीमचे कौतुक केले. छत्रपती संभाजीनगरच्या शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाची क्रांती घडून येण्याचा विशवास त्यांनी व्यक्त केला. ?मेझॉन फ्युचर इंजीनियरिंग आणि लीडरशिप फॉर इक्विटी तर्फे प्रदीप शिंदे,रविराज निंबाळकर , स्वप्निल बारहाते व रोहित बिडकर आदींनी नियोजन केले. विशाल टिप्रमवार व ज्योती मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल बारहाते यांनी केले.



क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रियदर्शनी मुलींची उच्च माध्यमिक विद्यालय कंधार येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा सौ. वर्षाताई संजय भोसीकर, संजय शिक्षण संस्था चे उपाध्यक्ष कृष्णभाऊ भोसीकर, प्राचार्य किरण बडवणे विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी. छाया - संतोष कांबळे

चंदननगर भागात मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय, गुन्हे शाखेचा छापा; एकास अटक

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेने छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी पाच तरुणींना ताब्यात घेतले. तरुणींना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी मसाज पार्लरच्या व्यवस्थापकाला अटक केली. नगर रस्त्यावरील चंदननगर भागात ही कारवाई करण्यात आली.

राहुल सुनील सिंह (वय २४, रा. समर्थ कॉम्प्लेक्स, मांजरी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सैबू शेख उर्फ सैबू मुबारकअली (रा. श्रीराम सोसायटी, चंदननगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या युनिट पाचमधील पोलीस हवालदार स्वाती तुपे यांनी याबाबत चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नगर रस्त्यावरील चंदननगर भागात एका इमारतीत मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट पाचच्या पथकाला गुरुवारी (३ एप्रिल) मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. पोलिसांनी मसाज पार्लरमधून पाच तरुणींना ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपी राहुल आणि सैबू यांनी तरुणींना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी राहुलला अटक केली. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदाराविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये (पीटा) गुन्हा दाखल करण्यात आला. चंदननगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे तपास करत आहेत.

शहरात मसाज पार्लरच्या नावाखाली गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे करण्यात आल्या होत्या. पोलीस आयुक्तांनी गैरप्रकार करणाऱ्या मसाज पार्लरवर कारवाईचे आदेश दिले होते. गेल्या वर्षी शहर, तसेच उपनगरातील ३५ मसाज पार्लरचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली होती. मसाज पार्लरच्या नावाखाली गैरप्रकार सुरू असल्यास कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्ह्याभरातील ग्रामपंचायत अधिकारी यांचे बेमुदत कामबंद आंदोलन ; कालबद्ध पदोन्नती, जुनी पेन्शन लागू करण्याची मागणी

परभणी ■ वसंत आवटे



जिल्हाभरातील ग्रामपंचायत अधिका-यांनी कालबद्ध पदोन्नती, जुनी पेन्शन योजना लागू करावी या व इतर मागण्यांसाठी आज शुक्रवार (दि. ११) पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले असुन ग्रामपंचायत कार्यालयाच्या चाव्या व कामकाजाचे शिक्के गटविकास अधिकारी यांच्याकडे जमा करण्यात आहेत.

यासंबंधी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन (डी.एन.ई.१३६) जिल्हा शाखा परभणी यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना १२ फेब्रुवारी रोजी मागण्यांचे निवेदन दिले होते. त्यानुसार याविषयी बैठक लावून प्रलंबित मुद्यावर सविस्तर चर्चा करत याबाबत आठ दिवसात आदेश निर्गमित करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. यासंदर्भात संघटनेच्या वारंवार पाठपुराव्यानंतरही आदेश निर्गमित होत नसल्याने ग्रामपंचायत अधिकारी युनियन जिल्हा शाखा परभणीने आक्रमक पवित्रा घेत जिल्हाभरात बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

जिल्हा परिषदेने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेत प्रलंबित मागण्यासंदर्भात तात्काळ आदेश निर्गमित करावे. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. व त्यासंबधीची सर्व जबाबदारी जिल्हा परिषद प्रशासनाची राहील, अशा आशयाचे निवेदन युनियनचे जिल्हाध्यक्ष डी. टी. दुधाटे , सरचिटणीस राजाराम सोळंके यांनी दिले आहे. या निवेदनावर अशोक भोसले, विश्वनाथ कांगणे, उद्धव खुपसे, राहुल मानोलीकर, पुष्पा काळे, गणेश गिते, प्रभाकर दुधाटे, अंजना लाडेकर, विश्वनाथ पवार, काशिनाथ जुकटे, संतोष जाधव, बळीराम खटिंग, बापूराव लांडे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

बाळाच्या जन्मापूर्वी आईने कोणत्या तपासण्या करणे आवश्यक

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : ग्रामीण भागातून उशिरा रेफर करणे, प्राथमिक उपचार न करता रेफर करणे, प्रसूतीदरम्यान अतिरक्तस्राव, झटके येणे यामुळे मृत्यू होऊ शकतो. वेदना मातेच्या लक्षात न येणे, प्रसुतीकळा, वेळीच रुग्णालयात न पोहोचणे, रुग्णालयात आल्यानंतर वेळीच उपचार न मिळणे. अतिरक्तदाब, कावीळ, किडनीवर परिणाम, प्रसुतीसाठी वेळेवर वाहन उपलब्ध न होणे ही काही कारणे मृत्यू ओढावून घेतात.

गर्भधारणेनंतर कधी आणि किती वेळा करावी तपासणी?

गर्भधारणेनंतर प्रसुतीपर्यंत किमान ८ तपासण्या होणे महत्त्वाच्या ठरतात, असे प्रसुतीतज्ज्ञांचे म्हणणे आहे. यामध्ये पहिल्या तीन महिन्यांत एकदा, नंतरच्या तीन महिन्यांत तीन आणि शेवटच्या तीन महिन्यांत चार तपासण्या करणे गरजेचे असते. यामुळे बाळाच्या हालचाली तसेच विविध आजार यासंबंधी माहिती मिळण्यास व उपचार होण्यास मदत मिळते.

बाळ होऊ देण्याचे योग्य वय

२१ ते ३० वर्षे या वयात पहिले मूल होणे योग्य असते म्हणजे या वयात आई होणे अधिक सुरक्षित असते. वयाच्या चाळीशीनंतर मूल होण्याचा आईबरोबर शिशूलाही थोका होऊ शकतो. प्रसूतीपूर्व तपासणी नियमितपणे केली पाहिजे

- डॉ. ज्योती जाधव, वाघोली, पुणे.

'योग्य काळजी घेतली तर माता मृत्यू टळू शकतात. गरोदरपणात किमान ८ तपासण्या केल्या पाहिजेत. त्यामुळे प्रसुतीवेळी धोका टळतो.'

- डॉ. दाफिया चिंचणीकर , वाघोली, पुणे.

वरठाण येथे ग्रामसभा उत्साहात संपन्न



दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे

सोयगाव : सोयगाव तालुक्यातील वरठाण येथे शुक्रवार ता ११ रोजी दत्त मदीराच्या ओट्यावर सकाळी दहा वाजता ग्रामसभा घेण्यात आली. ह्या सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनिल सोळंके हे होते सभेदरम्यान गाळ मुक्त धरण, गाळ मुक्त शिवार ,तसेच जिवंत सातबारा, व घरकुलासाठी गेल्या काही दीवसापुर्वी झालेला सर्वेत जो खरा लाभार्थी आहे त्यालाच लाभ मिळत नाही त्यासाठी पुन्हा अशा गरजु लाभार्थ्यांचा सर्व करुन त्यांना घरकुलचा लाभ देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सरपंच अनिल सोळंके यांनी सांगितले तसेच आदी विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले नुकतेच सी.एस.टीचर्स मेंटॉर प्रोगॅमचे बक्षिस वितरणमध्ये गोविंदनगर शाळेचे मुख्याध्यापक सुजित फलके यांना उत्कृष्ट पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामपंचायत च्या वतीने शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी ग्रामपंचायत अधिकारी विकास सिरसागर, सदस्य फीरोज ताबोळी, विशाल संसारे, भुषण जाधव तसेच विजयसिंग सोळंके ,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बापु दादा सोळंके, मनोज जाधव, नामदेव सुर्यवंशी, मगंलसिंग जाधव, गणसिंग खंडाळे, धनराज चौधरी, गोटु शिंदे, मनोज सुर्यवंशी, राजेंद्र खैरनार, नथ्थु शिंदे, कोतवाल प्रविण संसारे, समाधान सोळंके, सचिन सोळंके यांच्यासह आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांगीण प्रगतीचे समाज सुधारक म. फुले -डॉ. संजय ठवळे

कळमेश्वर ■ दिलीप येवले



कळमेश्वरः मोहपा ,येथील बॅरि. शेषराव वानखडे महाविद्यालय, मोहपा येथे थोर समाज सुधारक म. फुले. यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एम .व्ही. कोल्हे तर प्रमुख अतिथी म्हणून इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. संजय ठवळे. यांनी महात्मा फुले एक व्यक्ती नसून, एक विचार व जीवन जगण्याचा, समृद्ध करण्याचा आणि आचरणात आणण्याचा एक विचार आहे. या महामानवाने समाजाला मार्ग दाखवण्याचे काम सातत्याने केले आहे. म्हणूनच सर्वांगीण प्रगतीचे समाज सुधारक म. फुले आहे .अशा प्रकारे ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थितांशी संवाद साधत होते. व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित असलेले ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रमोद वडते होते. डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, डॉ. लीलाधर खरपूरीये, डॉ. अलका थोडगे, प्रा. सचिन काळे, प्रा. अनिता गणोरकर प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, श्री. संजयराव गणोरकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले, हरीश अंजनकर, प्रदीप बगळे, रजनी अकर्ते ,अरविंद डहाट, प्रकाश कोकडे, प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्तावित सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विनोद भालेराव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पवन उमप तर आभार शैलेश हातबुडे, कार्यक्रमाला विद्यार्थी वर्ग सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थित होता

प्रहार मिलिटरी स्कूल, रवी नगर येथे स्वर्गीय कर्नल सुनील देशपांडे यांच्या जन्मदिनानिमित्त प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : शौर्याची ज्योत, सेवाभाव उरात, कर्तव्यनिष्ठा जपली, उभी आयुष्यभर साथ देशासाठी झिजले, तरुणांचे आदर्श ठरले, कर्नल सरांना वंदन, आमच्या मनाचे शब्द थरथरले रवी नगर येथील प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये स्वर्गीय कर्नल सुनील देशपांडे यांच्या जन्मदिवसानिमित्त एक प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी त्यांच्या वाढदिवसानिमित्त गीताचे सादरीकरण करण्यात आले. तसेच कर्नल सरांना आदरांजली अर्पण करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वंदना कुलकर्णी यांनी देखील कर्नल सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करत विद्यार्थ्यांना शिस्त, सेवा व संस्कार यांचे महत्त्व पटवून दिले. शाळेच्या संचालक मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी स्वर्गीय कर्नल सुनील देशपांडे यांच्या कार्यास व जीवनमूल्यांना अभिवादन करत आपल्या भावना व्यक्त केल्या. 'कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन शाळेच्या शिक्षिका श्रीमती शोमा पाल यांनी केले.

अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळा तर्फे वृद्धाश्रम व अनाथालयना अन्न धान्य भेट



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : अमरनगर जेष्ठ नागरिक मंडळा दक्षिण तर्फे जेष्ठ नागरिक प्रतिष्ठिन नागपुर यांना अनाथालय व वृधाश्रमासाठी अन्नधान्याची छोटीसी मदत करण्यात आली. याप्रसंगी जेष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष देविदास आगरकर अमरनगर सुधार समितिचे अध्यक्ष डॉ. राजेश कुऱ्हाडे, वसंतराव इझनकर, विलास वाकडे निबांळकर काका रमेश जिल्लारे, रासेकरताई, गैरखेडेताई व अमरनगर येथील प्रतिष्ठित नागरिकगण सहभागी झाले होते.

म्हाळुंगे येथे रविवारी होणार मोफत कान, नाक, घसा तपासणी

भीमाशंकर ■ महंमद मुलाणी

भीमाशंकरः महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, कान, नाक, घसा तपासणी व मोफत औषध उपचार शिबिर, रविवार दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी म्हाळुंगे तर्फे आंबेगाव (कुशिरे बु. रोडवर) ता. आंबेगाव जि. पुणे येथे आयोजित केले गेले आहे.

आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात प्रथमच, कान, नाक, घसा यावरील हे मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे . यासाठी तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार होणार आहेत.

या शिबिरासाठी पुण्यातील सुप्रसिद्ध डॉक्टर, डॉ. जी.एम. वाडेकर व प्रियांका दांडेकर हे उपस्थित राहणार आहेत या शिबिरासाठी डॉ. तुषार पवार (तालुका आरोग्य अधिकारी, पं. स. आंबेगाव) मा. राहुल जोशी (वैद्यकीय अधीक्षक, तळेघर ग्रामीण रुग्णालय) , मा. नामदेव मेमाणे (सरपंच फलोदे -सावरली ग्रामपंचायत) , मा. सौ. भिमाबाई धादवड(सरपंच कुशिरे बु. ग्रामपंचायत) , मा. डॉ. अमोल वाघमारे (आदिम संस्था, आंबेगाव) , मा. श्री. लक्ष्मण मावळे (सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत पाटण - पिंपरी), मा. अशोक पेकारी (सामाजिक कार्यकर्ते), मा. श्री. धोंडू पारधी (अध्यक्ष तंटामुक्ती समिती , पाटण -पिंपरी ग्रामपंचायत) , कृष्ण वडेकर(सामाजिक कार्यकर्ते), मा. श्री. राजू घोडे (उपसरपंच बोरघर) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या शिबिराचे आयोजन, डॉ. शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र, म्हाळुंगे तर्फे आंबेगाव, ऋषा मेडिकल अंड रिसर्च सेंटर पुणे, वाडेकर हॉस्पिटल, माणिकबाग पुणे यांनी केलेले आहे. तसेच या शिबिरासाठी साथी संस्था, पुणे व आदिम संस्था, आंबेगाव यांचे सहकार्य राहणार आहे.

अत्याधुनिक नवीन अग्निशमन वाहनांचे पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते उद्घाटन



परभणी ■ वसंत आवटे

परभणी जिल्ह्यात घडणाऱ्या आपत्कालीन घटने दरम्यान जलद प्रतिसाद देणे करिता आर्य पंप्स कंपनीने तयार करुन दिलेल्या मिनी रेक्यू टेंडर अग्निशमन वाहनाचे राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, आपत्ती व्यवस्थापन मंत्रालय मदत व पुनर्वसन विभाग यांचे मार्फत जिल्ह्यात घडणाऱ्या आपत्कालीन घटने दरम्यान जलद प्रतिसाद देणे करिता जिल्ह्यातील एकूण तीन नगरपालिका व एक महानगरपालिका, अग्निशमन विभागास, अत्याधुनिक सर्व साहित्य नियुक्त असलेले गुरखा वाहन फायर रेस्क्यू मिनी टेंडर शासन स्तरावरून प्राप्त झाले आहे. अग्निशमन वाहने अनुक्रमे नगरपरिषद गंगाखेड, सेलू, जिंतूर व अग्निशमन विभाग, परभणी शहर महानगरपालिका यांना उपलब्ध करून दिली आहेत. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, शहर महानगरपालिका आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकर, उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पवन खांडके, संबंधित नगरपरिषद विभागाचे अग्निशमन अधिकारी कर्मचारी इत्यादी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय कामगार नेते, महेंद्रशेठ घरत यांनी संघटना पदाधिकारी व सहकार्याना घडविली लंडन वारी!



दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे

उरण : आय टी एफ लंडन या बहुराष्ट्रीय कामगार संघटनेच्या एक्झिक्युटिव्ह बोर्ड कमिटीची लंडन येथे ९ ते ११ एप्रिल रोजी बैठक सुरू असून एक्झिक्यूटिव्ह बोर्ड मेंबर म्हणून आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत भारत देशाचे प्रतिनिधी म्हणून या बैठकीत उपस्थित आहेत . लंडन येथे आय टी एफ चे मुख्य कार्यालय असून कार्यालयाचे कामकाज कशाप्रकारे चालते त्याचबरोबर जागतिक पातळीवर कामगार हिताचे निर्णय याच बैठकीत पारित होत असतात . एक्झिक्युटिव बोर्ड मेंबर म्हणून असणारे महेंद्रशेठ घरत यांनी आपल्या कामगार संघटनेचे पदाधिकारी व सहकार्यांना आयटीएफ लंडनचे मुख्यालय व तिथे चालणारे कामकाज हे पाहण्याकरता स्वखर्चाने सर्वांना लंडन वारी घडविली.

दूरदृष्टीचे समाज सुधारक म. फुले. - प्राचार्य, डॉ. कोल्हे



कळमेश्वर ■ दिलीप येवले

कळमेश्वर : मोहपा येथील बॅरि. शेषराव वानखडे महाविद्यालय, मोहपा येथे थोर समाज सुधारक म. फुले. यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एम .व्ही. कोल्हे तर प्रमुख अतिथी म्हणून इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. संजय ठवळे. यांनी महात्मा फुले यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. तर अध्यक्षीय भाषणातून डॉ. कोल्हे यांनी महात्मा फुले हे दूरदृष्टीचे समाज सुधारक होते. त्यांनी शिक्षण, शेती, जल ,आरोग्य, आदी ज्वलंत प्रश्नावर प्रकाश टाकला. नाहीतर त्यांनी कृतीतून सिद्ध केले. असे परखड मत त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विशद केले. व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित असलेले ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रमोद वडते होते. डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, डॉ. लीलाधर खरपूरीये, डॉ. अलका थोडगे, प्रा. सचिन काळे, प्रा. अनिता गणोरकर प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, श्री. संजयराव गणोरकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले, हरीश अंजनकर, प्रदीप बगळे, रजनी अकर्ते ,अरविंद डहाट, प्रकाश कोकडे, प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्तावित सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विनोद भालेराव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पवन उमप तर आभार शैलेश हातबुडे, कार्यक्रमाला विद्यार्थी वर्ग सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थित होता

उज्ज्वल भविष्यासाठी तरुण नेतृत्वाची आवश्यकता : खासदार अमर काळे

विकसित भारतासाठी तरुणांमध्ये नेतृत्व कौशल्ये आवश्यक : प्रो. कुमुद शर्मा;हिंदी विश्वविद्यालयात राष्ट्रीय युवा संसदेचे आयोजन

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या विद्यमाने आयोजित राष्ट्रीय युवा संसद कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून बोलतांना कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा म्हणाल्या की लोकशाही व्यवस्थेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि विकसित भारतासाठी तरुणांमध्ये नेतृत्व कौशल्ये आवश्यक आहेत. देशाप्रती अनुकूल आणि प्रेरणादायी मानसिकता निर्माण करण्यासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे. देशाच्या विकास आणि प्रगतीशी तरुणांना जोडणे हे युवा संसदेचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यामुळे तरुणांमध्ये संवाद, संभाषण आणि नेतृत्व कौशल्ये वाढतील. युवा संसदेमुळे तरुणांना भारतीय संसदेतील धोरणनिर्मिती, कायदा दुरुस्तीच्या प्रक्रिया समजून घेण्यास मदत होईल आणि ते देशाच्या प्रगती आणि विकासाशी जोडले जाऊ शकतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संबोधित करताना खासदार अमर काळे म्हणाले की देशाच्या चांगल्या आणि उज्ज्वल भविष्यासाठी युवा नेतृत्वाची आवश्यकता आहे आणि युवा संसदेच्या माध्यमातून तरुणांना संसदीय कामकाजाचे ज्ञान मिळते. त्यांनी सर्व युवा खासदारांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या सक्रिय सहभागाबद्दल आणि विविध मुद्द्यांवरील चर्चेबद्दल आनंद व्यक्त केला. देशाला नवीन नेतृत्व मिळावे म्हणून अशा स्पर्धा प्रत्येक महाविद्यालयात घेतल्या पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले की मजबूत भारताच्या उभारणीत तरुणांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यांना देशाच्या प्रत्येक समस्येची जाणीव असली पाहिजे. भविष्यातील नेतृत्व पुढे आणण्यासाठी
महाविद्यालयांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यावर भर देत ते म्हणाले की यामुळे लोकशाही





प्रक्रियेला अधिक बळकटी मिळेल आणि तरुण नेतृत्व विकसित होईल.

याप्रसंगी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे समूह संयोजक डॉ. प्रल्हाद माने व वसंतराव नाईक कला आणि सामाजिक विज्ञान संस्था, नागपूरचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख, अकादमिक परीक्षक प्रो. राहूल बावगे यांनीही संबोधित केले.

कार्यक्रमाच्या शेवटी युवा संसदेतील सर्वोत्तम सांसद म्हणून पवन उपाध्याय, वेदिका मिश्रा, स्नेहा राज, आशीष रंजन, देवव्रत दुबे, विवेक आणि सभापती रागिणी, महासचिव हर्ष गुप्ता, अनन्या गोंड, युगांक व आरती यांना सन्मानित करण्यात आले. युवा संसदेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि प्रमाणपत्रे देण्यात आली. सोमवार, ७ एप्रिल रोजी कस्तुरबा सभागृहात आयोजित राष्ट्रीय युवा संसदेत ५५ विद्यार्थ्यांनी भारत सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या विविध योजनांवर ५५ मिनिटे आपले विचार मांडले. चर्चेदरम्यान तरुण खासदारांच्या शेरोशायरी व कवितांनी सभागृह दुमदुमून गेले.

अभिरूप संसदेत विविध मुद्द्यांवर चर्चा, शून्य तास, खासदारांचा शपथविधी, शोक प्रस्ताव असे कामकाज पार पडले. विश्वविद्यालयाच्या विविध विभागातील विद्यार्थ्यांनी लोकसभेचे अध्यक्ष, पंतप्रधान, लोकसभेचे मुख्य सचिव, विरोधी पक्षनेते आणि इतर मंत्री अशा भूमिका बजावल्या. पाहुण्यांचे स्वागत शाल, सूतमाळ, सन्मान चिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

स्वागत आणि परिचय भाषण युवा संसदेचे निमंत्रक डॉ. बालाजी चिरडे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षण विभागाच्या सहायक प्रो. डॉ. सीमा बर्गट यांनी केले. उद्घाटन सत्राचे आभार सहायक प्रोफेसर डॉ. हेमचंद्र ससाने यांनी तर समारोपाचे आभार कुलसचिव प्रो. आनन्द पाटील यांनी मानले. कार्यक्रमाची सुरुवात कुलगीताने तर समारोप राष्ट्रगीताने झाला. यावेळी अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक, शोधार्थी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्धा जिल्ह्यातील उद्योगांचे महाराष्ट्र शासनासोबत ४७ सामंजस्य करार

जिल्ह्यात १२४७ कोटींची होणार गुंतवणूक ३३१४ नवतरुणांना रोजगाराच्या संधी जिल्हा गुंतवणूक परिषद कार्यशाळा

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : उद्योग क्षेत्रामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व गुंतवणूकदार तसेच व्यावसायिकांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्याकरिता आयोजित जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेमध्ये मेटल, ऑटोमोबाईल, जिनिंग प्रेसिंग युनिट, हॉटेलिंग अशा विविध कंपन्यासोबत ४७ सामंजस्य करार करण्यात आले, यातून जिल्ह्यात १ हजार २४७ कोटींची गुंतवणूक होणार असून त्यातून ३ हजार ३१४ नवतरुणांना रोजगाराच्या संधी प्राप्त होणार आहेत.

विकास आयुक्त उद्योग यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदचे आयोजन आशीर्वाद सेलेब्रेशन हॉल, नागपूर रोड वर्धा येथे करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले.

जिल्हाधिकारी यांनी मागील गुंतवणूक परिषदेतील जिल्ह्याची प्रगती अधोरेखित करतांनाच उद्योग विकासातील बदल व संधी आणि त्यात प्रशासनाचा सहभाग यांचे महत्व सांगितले. तसेच उपस्थित नवउद्योजकांसोबत संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले. अधिक्षकिय उद्योग अधिकारी शिवकुमार मुद्दमवार, नागपूर यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले.



गुंतवणूक परिषदेमध्ये मेटल, ऑटोमोबाईल, जिनिंग प्रेसिंग युनिट, हॉटेलिंग अशा विविध कंपन्यासोबत ४७ सामंजस्य करार करण्यात आले, यातून जिल्ह्यात १ हजार २४७ कोटींची गुंतवणूक होणार असून त्यातून ३ हजार ३१४४ नवतरुणांना रोजगाराच्या संधी प्राप्त होणार आहेत. सदर परिषदेसाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून २७५ नवउद्योजक, व्यावसायिक व गुंतवणूकदार उपस्थित होते.

या गुंतवणूक परिषदेकरिता मैत्री नोडल अधिकारी पद्माकर हजारे, ईवायच्या श्रीमती मीनाक्षी बागडे, यशस्वी उद्योजक अमित देवतळे, बँक ऑफ इंडियाचे झोनल अधिकारी कुश गन्होत्रा, स्टेट बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय अधिकारी सुधीर कुमार, युनिअन बँकेचे झोनल हेड गौरव कुमार, अग्रणी बँक व्यवस्थापक चेतन शिरभाते, उमेदचे मिशन व्यवस्थापक निरज नखाते हे उपस्थित होते.

या परिषदेत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेमध्ये जिल्ह्याने १०१ टक्के उदिष्ट साध्य केल्यामुळे, उत्कृष्ट काम करणाऱ्या बँकेचा व बँकेच्या शाखा व्यवस्थापकांचा जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला. जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक सुनील हजारे यांनी सर्वांचे आभार मानले.

'जयभीम पदयात्रा' कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'जयभीम पदयात्रा' कार्यक्रमाचे आयोजन दि. १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया जवळ, सिव्हील लाईन वर्धा येथे करण्यात येणार आहे. या पदयात्रेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम यांनी केले आहे.

'जयभीम पदयात्रा' कार्यक्रमाची सुरूवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा सिव्हील लाईन वर्धा येथून होणार असून ही पदयात्रा महात्मा गांधी चौक, विश्रामगृह, जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानापासून जिल्हा परिषद कार्यालय मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समाप्त होणार आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, शाळा, महाविद्यालय व इतर संस्थांचे विद्यार्थी, नागरिक या पदयात्रेत सहभागी होणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

१४ एप्रिल रोजी जात पडताळणी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : सामाजिक न्याय विभागाच्यावतीने दि. ८ ते १४ एप्रिल या कालावधीत सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंती निमित्त दि. १४ एप्रिल रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने
विद्यार्थ्यांसाठी जात पडताळणी मार्गदर्शन तसेच त्रुटी पुर्तता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त डॉ. मंगेश वानखडे यांनी केले आहे.

अ. भा. माळी महासंघा तर्फे महात्मा ज्योतिबा फुलेंना अभिवादन

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : थोर समाज सुधारक आणि महिलांच्या शिक्षणासाठी आग्रही असणारे महात्मा ज्योतिबा फुले यांना कॉटन मार्केट स्थित येथील शुक्रवारी ११ एप्रिल रोजी, अखिल भारतीय माळी महासंघ व क्रांती ज्योती माळी विकास संस्थे तर्फे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुलेंच्या १९८ व्या जयंती उत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महात्मा ज्योतिबा फुले यांचे कॉटन मार्केट येथील पूर्णाकृती पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला समाज बांधव उपस्थित होते. यावेळी पधाधिकारी श्री गोविंदराव वैराळे विश्वस्त, यागेश्वर सोनुले, मधुसुदन देशमुख, नामदेवराव



शेंडे, डॉ. रामकृष्ण येनकर , नंदकिशोर पाचपोर, कैलास जामगडे, कपिल उमाळे, शिवराम गुरनुले , नंदकिशोर आकरे, अमोल वैराळे, अंबादास गाडेकर, देवराव प्रधान, गणेश कडूकार, सौ. वसुधाताई रामकृष्णा येनकर, श्रीमती पुष्पा बनकर, सौ. वृषाली ओम वैराळे, प्रदीप चिंचमलकर, आणि प्रदीप मांदाडे आदीची मोठ्या संखेने महात्मा फुलेचे अनुयाई उपस्थित होते.

शहरातील सर्व भाग सीसीटीव्हीच्या निगराणीमध्ये आणा : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : नागपूर शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरात सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आलेले आहेत. यातील बंद व नादुरुस्त कॅमेरे पुन्हा संचालित करुन शहरातील रस्ते, गल्लोगल्ली तसेच सर्व भाग सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीमध्ये आणा, असे निर्देश महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

नागपूर शहर तसेच जिल्ह्यातील विविध विषयांच्या अनुषंगाने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी जिल्हा नियोजन भवन येथील सभागृहात आढावा बैठक घेतली. बैठकीत



पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपा उपायुक्त विनोद जाधव यांच्यासह पोलिस, महापालिका आणि जिल्हा प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी शहरातील सीसीटीव्ही कॅमेरांच्या स्थितीचा आढावा घेतला. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी माहिती दिली. शहरात सुरक्षेच्या दृष्टीने एकूण ३६०० सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आले आहेत. यापैकी काहींमध्ये बिघाड आल्यामुळे बंदावस्थेत असल्याचे त्यांनी सांगितले.
नागरिकांची सुरक्षा ही सरकारची
प्राथमिकता आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने शहरात निगराणीसाठी सीसीटीव्ही कॅमेरांची मोठी मदत होते. शहरातील सीसीटीव्ही कॅमेरांची यंत्रणा अधिक अद्ययावत करण्याची गरज असून यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. नव्याने शहरातील सर्व भागात सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात येतील. जास्तीत जास्त भाग कव्हर व्हावा यादृष्टीने ठिकाण निवडण्यात यावेत. आवश्यकता भासल्यास खासगी जागेमध्ये देखील कॅमेरांचे खांब लावण्यात यावे. यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करावी, असेही निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

शहरातील नादुरुस्त कॅमेरांच्या संदर्भात राज्याचे माहिती व तंत्रज्ञान मंत्री यांना पत्र देण्यात येईल. यासोबतच 'महाआयटी'च्या अधिकाऱ्यांची लवकरच बैठक घेण्यात येईल, असेही बावनकुळे यांनी सांगितले. त्यांनी शहरातील नागरिकांच्या घरामधील सीसीटीव्हीची कनेक्टिव्हिटी पोलीस यंत्रणेकडे घेण्याबाबत पडताळणी करण्याची सूचनाही त्यांनी केली.

डॉ. आंबेडकर मानवतेचे पुरस्कर्ते होते : कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा

हिंदी विश्वविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त परिसंवाद

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात भारतरत्न बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित परिसंवादाच्या अध्यक्ष म्हणून बोलतांना कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा म्हणाल्या की डॉ. आंबेडकर मानवतेचे पुरस्कर्ते होते. बंधुता, समता आणि स्वातंत्र्य या तीन शब्दांच्या आधारे त्यांनी एक वैचारिक मोहीम सुरू केली. शुक्रवार, ११ एप्रिल रोजी गालिब सभागृहात आयोजित परिसंवादात संस्कृति विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. दिगम्बर तंगलवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिदो कान्हू मुर्मु दलित व जनजाती अध्ययन केंद्राचे प्रभारी निदेशक व परिसंवादाचे संयोजक डॉ. बालाजी चिरडे, प्रदर्शनकारी कला विभागाचे सहायक प्रोफेसर डॉ. सतीश पावडे, डॉ. भदंत आनंद कौसल्यायन बौद्ध अध्ययन केंद्राचे सहायक प्रोफेसर डॉ. सुरजीत कुमार सिंह व मराठी साहित्य विभागाचे सहायक प्रोफेसर डॉ. संदीप सपकाळे यांनी विचार माडले.

कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा डॉ. आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करतांना म्हणाल्या की डॉ. आंबेडकर आणि ज्योतिबा फुले हे मानवतेचे विणकर होते. डॉ. आंबेडकरांच्या पत्रकारितेचा उल्लेख करताना त्या म्हणाल्या की, मूक नायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत यांसारखी नियतकालिके प्रकाशित करून त्यांनी सामाजिक मोहिमा सुरू केल्या आणि महिला, दलित आणि वंचितांच्या संघर्षांना आवाज दिला. या मासिकांच्या शीर्षकांमध्ये खोल अर्थ आहे. त्यांना असा मानव निर्माण करायचा होता जिथे डोळे आणि हृदय यात कोणताही भेदभाव नसेल. संविधानाच्या शिल्पकाराने आपल्याला दिलेली मूल्ये आत्मसात करून भक्कम आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. सतीश पावडे महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या कलात्मक दृष्टिकोनावर आपले विचार व्यक्त करतांना म्हणाले की दोघांच्या कलात्मक दृष्टिकोनात साम्य आहे. ते समाजाचे मार्गदर्शक आणि सत्यशोधक होते. महात्मा फुले 'सत्यमेव जयते'चे प्रवर्तक होते. डॉ. आंबेडकर व्हायोलिन वाजवत असत. शालेय जीवनात त्यांनी



नाटकांमध्येही काम केले. ते एक नाट्य समीक्षक होते. डॉ. सुरजीत कुमार सिंह भारतीय संविधानात अंतर्निहित कल्याणकारी राज्याची भूमिका आणि आंबेडकरांच्या विषयावर बोलतांना म्हणाले आपण भारतीय संविधानातील मूल्यांचे पालन केले पाहिजे आणि मतदानाचा अधिकार, अंतर्गत सुरक्षा, आरोग्य सेवा, पंचायती राज इत्यादी व्यवस्थांमध्ये मूलभूत बदल घडवून आणले पाहिजेत. डॉ. संदीप सपकाळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यिक विचारसरणीच्या विषयावर आपले विचार व्यक्त करताना सांगितले की डॉ. आंबेडकर सहभोजन आणि सहविवाहाचे समर्थक होते. साहित्य हा अस्पृश्यता निर्मूलनाचा मार्ग होय असे ते मानत. त्यांनी 'शहाणी मुलगी' नाटक लिहिले आणि त्यात अभिनय केला. त्यांना संस्कृतबद्दल विशेष आकर्षण होते. डॉ. आंबेडकरांनी साहित्य, समता आणि समाज संघटना स्थापन केली होती. डॉ. बालाजी चिरडे यांनी डॉ. आंबेडकर यांनी लिहिलेल्या 'पाकिस्तान' या पुस्तकाची प्रस्तावना देताना सांगितले की हे पुस्तक न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे चार भागात लिहिले गेले आहे, ज्यामध्ये भारताच्या फाळणीचा सविस्तर आढावा मांडण्यात आला आहे. प्रो. दिगम्बर तंगलवाड बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांवर प्रकाश टाकताना म्हणाले,डॉ. आंबेडकरांनी राजकीय स्वातंत्र्यासोबतच सामाजिक स्वातंत्र्यासाठीही लढा दिला. विश्वविद्यालयाच्या सिनेटची रचना तयार करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. उच्च शिक्षणात संशोधनावर अधिक भर दिला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर आणि ज्योतिबा फुले यांच्या फोटोंना पुष्पांजली अर्पण करून झाली. स्वागत व प्रास्ताविक डॉ. बालाजी चिरडे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिदो कान्हू मुर्मू दलित व जनजाती अध्ययन केंद्राच्या सहायक प्रोफेसर डॉ. किरण कुंभरे यांनी केले तर सहायक प्रोफेसर डॉ. राकेश सिह फकलियाल यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात कुलगीताने तर सांगता राष्ट्रगीताने झाली. या प्रसंगी प्रो. हनुमानप्रसाद शुक्ल, डॉ. रामानुज अस्थाना, डॉ. एच.ए. हुनगुंद, डॉ. विपिन पाण्डेय, डॉ. जयन्त उपाध्याय, डॉ. अनवर अहमद सिद्दीकी, डॉ. राजेश लेहकपुरे, डॉ. राजीव रंजन राय, डॉ. आनंद भारती, डॉ. शैलेश मरजी कदम, डॉ. राम प्रकाश यादव, डॉ. सूर्य प्रकाश पाण्डेय, डॉ. आम्रपाल शेंदरे, डॉ. राम कृपाल, बी.एस. मिरगे, डॉ. मीरा निचळे, डॉ. प्रदीप, डॉ. जगदीश नारायण तिवारी, डॉ. वागीश राज शुक्ल, डॉ. रणंजय कुमार सिंह, डॉ. अभिषेक सिंह यांच्यासह अध्यापक, शोधार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पेंच प्रकल्पांतर्गत प्रास्तावित सात प्रकल्पांना गती आवश्यक : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

सिंचन योजनेच्या लाभ क्षेत्रात पाणी का पोहचत नाही असा पालकमंत्री बावनकुळे यांचा उद्विग्न सवाल

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : मध्यप्रदेशात चौराई धरणामुळे पेंच प्रकल्पांतर्गत निर्माण झालेली पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी आपण सात उपसा सिंचन योजनांना मान्यता दिली आहे. या पाणी तुटीमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाय योजनांना शासनाने दुष्काळ निवारण कार्यक्रमात मान्यताही दिली आहे असे असतांना या कामाला गती मिळणे अपेक्षित होते. याचबरोबर जे प्रकल्प पूर्ण झाले आहेत त्या प्रकल्पांतर्गत असलेल्या लाभ क्षेत्रातील शेवटच्या लाभधारकापर्यंत पाणी का पोहचत नाही असा उद्विग्न सवाल राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

नियोजन भवन येथे विविध विभागाच्या आढावा बैठकीत ते



बोलत होते. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, मुख्य अभियंता रवी पराते, अधीक्षक अभियंता सोनाली चोपडे, कार्यकारी अभियंता केतन आकुलवार व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पेंच प्रकल्पाच्या ४० टक्के लाभ क्षेत्रात पाणी पोहचत नाही. या प्रकल्पाच्या टेलवर अडचण आहे. अनेक शेतकरी व ग्रामस्थ याबाबत सातत्याने शासनाला विनंत्या करीत आहेत. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पेंच प्रकल्पांतर्गत सात उपसा सिंचन योजनांना गती दिली जाईल. मात्र ज्या क्षेत्रात, गावात पाणी पोहचत नाही अशा गावांचा सर्वे करुन नेमक्या किती व कोणत्या गावात पाणी पोहचत नाही याचा वस्तुस्थितीदर्शक सर्वे करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सिंचन अधिकाऱ्यांना दिले.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी याला जलयुक्त शिवार योजनेची जोड दिली आहे. जिल्ह्यातील काटोल, नरखेड या दोन तालुक्यात पाण्याची पातळी खुप खोल गेली आहे. भविष्यातील पाणीप्रश्नचा आवाका लक्षात घेता पाणीटंचाई अंतर्गत विहिर पुर्नभरण कामांवर भर, जेवढ्या गावांसाठी नळयोजना आहेत त्या नळयोजनांच्या पाणी स्त्रोतांचे बळकटीकरण यावर भर देण्यास त्यांनी सांगितले.

कामदा एकादशी निमित्त विघ्नहरओझर मंदिरात महाआरती

जुन्नर ओझर ■ सचिन थोरवे



जुन्नर ओझर : विघ्नहर्ता गणरायाची मनोभावे पूजा केल्यास विघ्नहर भक्तांच्या मदतीला धावतो त्याचप्रमाणेभक्तांचे विघ्न दूर करून यश आणि कीर्ती वाढते अशी ख्याती अष्टविनायकापैकी ओझर येथे असलेल्या विघ्नहर गणरायाची असल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक गणेश भक्त या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी येत असतात

विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट यांच्यावतीने या ठिकाणी अनेक उपक्रम या ठिकाणी राबवली जातात जय गणेश भक्त या ठिकाणी दर्शनासाठी येतात त्यांना कमी किमतीमध्ये अन्नप्रसाद त्याचप्रमाणे रात्री रात्री आलेल्या गणेश भक्तांसाठी देवस्थानच्या वतीने भक्तनिवास देखील या ठिकाणी उभारण्यात आलेला आहे त्या ठिकाणी आलेल्या गणेश भक्तांना राहण्यासाठी चांगले सुविधा देवस्थानच्या माध्यमातून दिले जातात

महिन्याच्या प्रत्येक चतुर्थीला गणेश भक्तांच्या तसेच निमंत्रित पाहुण्यांच्या आणि मान्यवरांच्या शुभ हस्ते देवस्थानच्या वतीने महारथीचे नियोजन करण्यात येते दोन दिवसापूर्वी कामाला एकादशीनिमित्त विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट ओझर यांनी खालील पाच मान्यवरांना महाआरतीसाठी निमंत्रित केले होते त्यापैकी विज्ञान सहकारी साखर कारखान्याचे जेष्ठ संचालक विलास शेठ दांगट जुन्नर तालुका युवा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सचिन थोरवे विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे कर्मचारी शेखर भाऊ कवडे तसेच दर्शनासाठी येणारे गणेश भक्त

यांना सतत आरतीचा मान देवस्थानच्या वतीने देण्यात आला तसेच देवस्थानचे कर्मचारी शेखर कवडे यांचा वाढदिवस असल्यामुळे देवस्थानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देखील दिल्या

महाआरती पार पडल्यानंतर गणरायाला नैवेद्य ठेवून सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आले तदनंतर महाआरतीचे मानकरी यांचा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे उपाध्यक्ष तुषार कवडे तसेच त्यांचे सर्व विश्वस्त महिला सौशिल्पाताई जगदाळे सचिव सुनील हेगडे खजिनदार दत्तात्रय कवडे विश्वस्त प्रकाश मांडे श्रीकांत रवळे विलास कवडे संतोष कवडे मंगेश पोखरकर समीर मांडे विनायक मांडे यांनी देवस्थान ट्रस्टच्या वतीने आरतीसाठी आलेल्या यजमान महिलांना विश्व संकल्प फाउंडेशन च्या वतीने बेलाचे झाड देण्यात आले यावेळी विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे यांनी आयुष्यामध्ये झाडांचे महत्त्व किती महान किमतीची आहे हे पटवून सांगितले बेलाच्या झाडाबरोबरच गणरायाची आणि श्रीफळ देऊन सन्मान केला

यावेळी विघ्नहर चे संचालक विलास शेठ दांगट शेतकरी संघटनेचे सचिन थोरवे यांनी मनोभावे सेवा केल्यामुळे आज आमच्या आयुष्यातील महाआरती म्हणजे दुग्ध शरकरा योग असल्याचे सांगितले तसेच उपस्थित सर्वांचे आभार ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे यांनी मानले

तायवाडे महाविद्यालय येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : तायवाडे महाविद्यालय महादुला, कोराडी येथे नुकतीच महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहाने संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून नागपूर येथील शिवराज विद्यालयाच्या प्राचार्य स्मिता मेहत्रे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे विचारपीठावर विराजमान होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमा प्रसंगी पुष्पगुच्छ देऊन अतिथींचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या स्मिता मेहत्रे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार हे आजच्या काळातही गरजेचे आहे. असे म्हटले. त्यांनी महात्मा ज्योतिबा फुलेंनी केलेलि स्त्री शिक्षणाची सुरुवात, विधवा विवाह, मध्यान्न भोजन, कामगार व शेतकऱ्यांसाठी लढा, नाव्ह्यांचा संप, दुष्काळात जनतेची सेवा, सत्यशोधक समाजाची स्थापना करून मानवता धर्म जनतेपर्यंत पोहोचविला. त्यांनी आपल्या विचारातून समताधिष्टीत समाज निर्मिती केली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा, सती प्रथा बंद केली. गुलामगिरी, सार्वजनिक सत्य धर्म यासारखे ग्रंथ लिहून लोकजागृती व समाज प्रबोधन केले. आज सुदृढ समाज निर्मितीसाठी आपण आपल्या मुलांवर त्यांच्या विचारांची व संस्काराची रोपण करण्याची गरज आहे. असे सांगितले.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांनी आज आपण श्रद्धेतून अंधश्रद्धेकडे जातो ते थांबले पाहिजे. आपण खरा इतिहास समजून घेतला पाहिजे व ते विचार पुढच्या पिढीला द्यायला पाहिजे. त्यासाठी आपण ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. समताधिष्टीत समाज निर्मितीसाठी महात्मा ज्योतिबा फुलेंच्या विचारांची आजही समाजाला गरज आहे. असे मत मांडले. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या जयंती पुण्यतिथी समितीचे समन्वयक प्रा . डॉ. मारोती वाघ यांच्या नेतृत्वात पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.गजानन पोलेनवार यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा . डॉ. सुनील घुगल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती पुण्यतिथी समितीचे सदस्य प्रा .डॉ. गजानन पोलेनवार , प्रा.डॉ सुनील घुगल, प्रा. डॉ. दिगांबर समर्थ, प्रा. डॉ .चंचल देशमुख, प्रा. डॉ. कमलेश डाबरे इत्यादींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायडे यांच्या सहकार्यामुळे पार पडला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

महात्मा फुलेंचे विचार आत्मसात करून जीवन व्यतीत करावे : सिद्धार्थ सोमकुवर

कारंजा (घा.) ■ गौरव सोमकुवर



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या यांच्या समतादूत प्रकल्पा मार्फत महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४जयंती निमित्त ७ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत भारतीय संविधान अमृत महोत्सव सप्ताह सोहळा आयोजित करण्यात आला आहे.आज वर्धा जिल्यातील कारंजा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरी येथे सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती हिरा रा येसकर या होत्या तर कार्यक्रम माचे मुख्य मार्गदर्शक म्हणून कारंजा समतादूत सिद्धार्थ सोमकुवर तर पाहुणे म्हणूनविनायक भांगे व श्री नितेश म महात्मे

श्री राजेश गु दारोकर व कु कविता ज्ञा भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुरुवातीला सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पूजन करण्यात आले. यावेळी समतादूत सिद्धार्थ सोमकुवर यांनी अतिशय सुंदर मार्गदर्शन उपस्थित विद्यार्थीयांना केले.

प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी साहुर गावातील नागरिकांना समजतो कचरा;हम करे सो कायदा हिटलरवादी लोखंडे यांचा प्रताप

साहूर ■ शरद वरकड

साहुर : आष्टी तालुक्यातील साहुर येथील अंगणवाडी विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्यास एकमेव हिटलरशाही गाजवणारा प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी लोखंडे असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे जर मुलांच्या पालकांच्या समस्या जाणून घेतल्या असत्या तर आज नियमित अंगणवाडीत येणाऱ्या चिमुकल्यांची संख्या चार ते पाच राहिली नसती जेव्हा जेव्हा पालकांना आपल्या समस्या प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी लोखंडे यांच्या सामोर मांडल्या तेव्हा तेव्हा पालकांना हा अधिकारी कचरा समजला आणि दुर्लक्ष केले त्यामुळे अनेक पालकांनी आपल्या मुलांचे नाव प्रायव्हेट कॉनव्हेट मध्ये टाकले व काही पालक मुलांना अंगणवाडीत पाठवत नाही त्यामुळे अंगणवाडीतील मुलांची संख्या कमी झाली आहे जर हाच अधिकारी प्रभारी बालविकास प्रकल्पअधिकारी म्हणून कार्यरत राहिला तर येत्या दोन वर्षात फक्त अंगणवाडीच्या बिल्डिंगा दिसणार असून विद्यार्थी दिसणार नाही अशाप्रकारची चर्चा साहुर गावात नागरिक करीत आहे



माझी मुलगी लहान असुन मी वार्ड क्र. एक मध्ये राहतो आम्हची अंगणवाडी दुर असुन मुख्य वाहतूकीचे रस्ते ओलांडावे लागतात त्यामुळे माझी मुलगी अंगणवाडीत जात नाही आणि मी गवंडी काम करत असुन मी मुलीला दररोज येणे जाणे करू शकत नाही परंतु आता आम्हच्या वार्डात नविन इमारत बनली तेथे जर दुसऱ्या वार्डातील मुले बसविले आणि आम्हचे मुले दुर पाठवत असेल तर उद्घाटन करण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्याले त्याच अंगणवाडीत कोंबुन ठेवल्याशिवाय राहणार नाही.

विनोद लांडगे (पालक)

अ.भा. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुलेंना अभिवादन



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : अ.भा. महात्मा फूले समता परिषद नागपूर जिल्हा तर्फे क्रांतीसूर्य थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फूले यांच्या १९८ व्या जयंतीनिमीत्य कॉंटन मार्केट नागपूर येथे त्यांच्या प्रतीमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समता परीषदेचे जिल्हा अध्यक्ष मनोज गणोरकर, महीला अध्यक्ष विद्या बहेकार, वर्धा जिल्हा महीला अध्यक्ष कविता मूंगळे, नागपूर जिल्हा महासचिव सचिन मोहोड, नागपूर जिल्हा उपाध्यक्ष योगेश ठाकरे, नागपूर ग्रा.ता. उपाध्यक्ष अविनाश वडे कामठी, तालुका उपाध्यक्ष विजय मूळे, यशवंतजी तेलंग, साधना आंबूलकर व इतरही समता सैनिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी कामठी आणि रनाळा क्षेत्रात १५ ते १७ एप्रिल दरम्यान शिबिराचे आयोजन

नागपूर ■ दिलीप येवले

गृहपयोगी साहित्य संचाचे वाटप - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार;आतापर्यंत २३ हजार कामगारांना साहित्य वाटप



नागपूर : राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर-अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष पुढाकाराने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातंर्गत आयोजित गृहपयोगी साहित्य संच वाटप शिबिराला बांधकाम कामगारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. १ एप्रिल पासून सुरू झालेल्या या शिबिरात आतापर्यंत २३ हजार नोंदणीकृत कामगारांनी याचा लाभ घेतला आहे.

आता १५ ते १७ एप्रिल दरम्यान कामठी शहर नगर परिषद क्षेत्रात जुने नगर परिषद, कामठी येथे आणि भिलगाव-रनाळा जिल्हा परिषद व येरखेडा नगर पंचायत क्षेत्रात पंकज मंगल कार्यालय, रनाळा या ठिकाणी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. फक्त नोंदणीकृत बांधकाम कामगारांनाच गृहपयोगी वस्तू संच मिळणार आहे. शिबिरात एकूण ३० गृहपयोगी वस्तूंचा संच दिले जाणार आहेत. कामगारांनी येताना सोबत आधार कार्ड, कामगार नोंदणी पुस्तक, १ रुपया नोंदणी पावती आणि दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आणावे.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या कार्यालयातील कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते अथक परिश्रम घेत आहेत.

अखेर कारंजा नगरपंचायतला अग्निशमन गाडी दाखल : नागरी समितीच्या मागणी व संघर्षाला यश

कारंजा (घा.) ■ गौरव सोमकुवर



कारंजा (घा.) : कारंजा घाडगे नगरपंचायतला प्रलंबित व बहुप्रतिक्षित अग्निशामक गाडी तारीख १० एप्रिल रोजी अखेर दाखल झाल्याने कारंजा नागरी समस्या संघर्ष समितीने आनंद व्यक्त करत नगरपंचायतचे अभिनंदन केले आहे.

३०-३५ वर्षापासुनचा कारंजा तालुका अग्निशमन यंत्रणेविणा वंचित होता. अग्निशमन यंत्रनेची मूलभूत गरज व महत्त्व लक्षात घेता स्थानिक कारंजा नागरी समस्या संघर्ष समितीने पाच वर्षापूर्वी २९ मे २०२० रोजी एका निवेदनाद्वारे अग्निशमन यंत्रणेच्या मागणीची सुरुवात केली होती. त्यावेळी तत्कालीन नगराध्यक्ष कल्पना मस्की व मुख्याधिकारी पल्लवी राऊत यांच्या कार्यकाळात कोरोना कालखंडात त्यांनी ऑनलाइन सभा व ठराव घेऊन अग्निशमन गाडी खरेदीच्या प्रस्तावाला सुरुवात झाली होती. आणि तेव्हाच २०२० पासून नगरपंचायतने नागरिकांकडून अग्निशमन कर आकरणीला सुरुवात केली हे विशेष.

त्यानंतर पुन्हा नगरपंचायतने सप्टेंबर २०२२ मध्ये ठराव घेऊन महाराष्ट्र अग्निशमन अभियान अंतर्गत अग्निशमन वाहन खरेदी करीता ६०००-८००० लिटर क्षमतेच्या वाहणाकरीता चेसीस खरेदी व बांधणी करण्याकरीता तांत्रिक मान्यता मिळण्याकरिता नोव्हेंबर २०२२ मध्ये संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई येथे नव्याने प्रस्ताव पाठविला असल्याची माहिती नागरी समितीने माहिती अधिकारांतर्गत मिळवली.

मधल्या काळात कारंजा शहरात व तालुक्यात बऱ्याचदा आगीच्या दुर्घटना घडून गेल्या. मागील वर्षी एका नगरसेवकाच्या मोबाईलच्या दुकानाला आग लागल्याची दुर्घटना घडल्याने लाखो रुपयाचे आर्थिक नुकसान झाले होते. त्यावेळी आष्टी किंवा आर्वी वरून अग्निशमन गाडी बोलावून आग विझावावी लागली होती.

रखडलेल्या प्रस्तावाकडे व खरेदी प्रक्रियेकडे नगर पंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरीता कारंजा नागरी समस्या संघर्ष समितीने १८ मे २०२३ रोजी प्रभारी मुख्याधिकारी शहा यांना कठोर स्मरणपत्र देऊन मागणीची उजळणी केली. १ ऑगस्ट २०२३ रोजी क्रांतीदिनी तहसील कार्यालयापुढे झालेल्या एक दिवसीय धरणे आंदोलनामध्येही इतर मागण्यांसह अग्निशमन गाडीची मागणी होतीच. १८ ऑक्टोंबर २०२३ मध्ये अग्निशमन गाडीच्या मागणी करीता मुख्याधिकाऱ्यांना नागरी समितीने अतिकठोर स्मरण पत्र दिले होते. त्यानंतर १५ जानेवारी २०२४ रोजी नगरपंचायत कार्यालयापुढे घंटानाद आंदोलन द्वारे सांगा साहेब ,आग लागली तर विझवायची कशी ? असा प्रश्न उपस्थित करून अग्निशमन यंत्रणेच्या प्रलंबित मागणीकडे नगरपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मागील वर्षी गांधी जयांतीला २ ऑक्टोंबर २०२४ रोजी तहसील कार्यालयाकडे विविध मागण्यांकरिता केलेल्या एक दिवसीय धरणे आंदोलनात अग्निशमन गाडीच्या मागणीचा समावेश होताच.

अशाप्रकारे अनेकदा निवेदने, स्मरणपत्रे, धरणे व घंटानाद आंदोलनाद्वारे कारंजा नागरी समस्या संघर्ष समिती मागील पाच वर्षापासून सातत्याने अग्निशमन गाडीच्या मागणीकडे शासन प्रशासन व लोकप्रतिनिचे लक्ष वेधत आली आहे. आणि प्रसार माध्यमांनीही वेळोवेळी अग्निशमन गाडीची गरज अधोरेखित केली होती.

अखेर नगरपंचायत च्या आवारात अग्निशमन गाडी दाखल झाल्याने कारंजा नागरी समस्या संघर्ष समितीने आनंद व समाधान व्यक्त करून नगरपंचायतचे अभिनंदन करीत असल्याचे म्हटले आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242